रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड | शुक्रवार । दि. ७ ऑगस्ट २०२६ । अंक ६२ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## अखेर डॉक्टरांचा संप मागे

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर निवासी डॉक्टरांच्या संघटनेने अखेर संप मागे घेण्याची घोषणा केली. त्यामुळे राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील ओपीडी, आयपीडी, नियोजित शस्त्रक्रिया, प्रयोगशाळा सेवा आणि शैक्षणिक उपक्रम पुन्हा पूर्ववत सुरू होणार आहेत. दरम्यान, न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान राखून संप मागे घेतला असला तरी सीसीएमपी पात्र डॉक्टरांच्या नोंदणीला असलेला विरोध कायम असून, त्यासाठी कायदेशीर मार्गाने आंदोलन सुरू राहील, अशी भूमिका एमएआरडीने स्पष्ट केली.

## २९ ऑगस्टला निर्णायक आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप केला. मराठा समाजाच्या तरुणांचे नुकसान करण्याचा प्रयत्न सुरू असून, पुरावे असतानाही प्रमाणपत्रे रद्द केली जात असल्याचा दावा त्यांनी केला. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि सरकारवर टीका करत, आता मी जाईन, नाहीतर सरकार जाईल, असा इशारा त्यांनी दिला. तसेच, २९ ऑगस्ट रोजी निर्णायक आंदोलन छेडण्याची घोषणा करत सरकारने राजकारण न करता मराठा समाजाला न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

SARASWATI EDUCATION SOCIETY

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
TASGAONKAR GROUP
OF INSTITUTES
SHAPE THE LEADERSHIP
Web : www.tasgaonkartech.com Email : contact@tasgaonkartech.com

Rumours don't build carrier, WE DO!!!

3 Campuses | 9 Institutions | 8,000+ Students | 3 Hospitals | 65 Acres of Lush Green Campus

OUR INSTITUTIONS

HEALTHCARE
- Raigad Hospital & Research Centre
- Dr. N. Y. Tasgaonkar Institute of Medical Science (M.B.B.S.)
- Dr. N. Y. Tasgaonkar College of Physiotherapy (NYTCP)
- Yadavrao Tasgaonkar Institute of Pharmacy (YTIP Degree) DTE Code : 03232
- Yadavrao Tasgaonkar Institute of Pharmacy (YTIP Diploma) DTE Code : 03232
- Jeevak Ayurveda Rugnalaya
- Sau. V. N. Tasgaonkar Ayurved Mahavidyalay & Sanshodhan Kendra
- Sau.Vandana N.Tasgaonkar College of Nursing (MUHS)
- Sau. Vandana N.Tasgaonkar School of Nursing GNM
- Raigad Homeopathic Hospital

TECHNICAL
- Yadavrao Tasgaonkar Institute of Engineering and Technology (YTIET) DTE Code : 03147
- Yadavrao Tasgaonkar College of Engineering & Management (YTCEM) DTE Code : 03220
- Yadavrao Tasgaonkar Polytechnic (YTP) DTE Code : 03282
- Yadavrao Tasgaonkar Public School (CBSE)
- Yadavrao Tasgaonkar Public School (Jr.Collge)







Campus Life...
- Well Equipped, Modern Auditorium with UFO facility for 250 person
- Volleyball Court, Olympic Size Swimming Pool, Basket Ball, Lawn Tennis Court etc.
- 20 Buses available for pick & drop facility from Bhivpuri Rd. Rly Stn, Panvel, Pen

Shaping Minds.. Transforming Futures (Since 2003)
TURN YOUR DREAMS Into DEGREES
Where ambition meets Opportunity & success begins.

FACILITIES WE PROVIDE
- Separate Hostel for Girls & Boys (410 Rooms)
- Well Qualified & Experienced Faculty
- Physical & Digital Library
- Well Equipped Laboratories
- 100% Placement Assistance
- Modern Auditorium with UFO Facility
- Olympic Size Swimming Pool
- Transportation Facility
- Cafeteria, Canteen & Student Mess
- Reading & Conference Rooms
- Government & Management Scholarships
- Volleyball Court, Basketball & Lawn Tennis
- Sports & Cultural Activities
- On-Campus Healthcare Facility
- High-Speed Wi-Fi Campus

WHY CHOOSE TASGAONKAR?
Safe & Secure Campus Green & Eco-Friendly Environment
Industry–Institute Interaction, Innovation & Entrepreneurship Cell Value-Based Education

ADMISSIONS OPEN 2026-2027



TASGAONKARGROUPOFINSTITUTIONS

OUR CAMPUSES
WELL CONNECTED TO MUMBAI THROUGH RAILWAY : Trains arrive at Bhivpuri Road Railway Station every half an hour.

Chandhai Campus : Dr. N. Y. Tasgaonkar Educational Complex, At. Chandhai, Post Nasrapur, Bhivpuri Road Station, Tal. Karjat,Dist. Raigad – 410201
Diksal Campus : Sau. Vandana N. Tasgaonkar Educational Complex, At Diksal, Post Koshane,Opp. Bhivpuri Station, Tal. Karjat,Dist. Raigad – 410201
Vadavali Campus : At.Vadavli, Po. Kadav, Tal. Karjat, Dist. Raigad - 410201

For Medical : 8983621211 | Enquiry : 8793661611, 7387089899, 8087481027, 8149679293 / 9763722256

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

७ ऑगस्ट
१) श्रीम.नीला नारायण सावंत, ब्राम्हणआळी,अलिबाग, ७-८-१९३८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**प्रेमजी जिवराज जैन**
**अलिबाग**

## प्रतिभा लोखंडे यांचे निधन



**तळा :** तळा तालुक्यातील मालाठे येथील माजी जि. प. सदस्य केशव लोखंडे यांच्या पत्नी प्रतिभा लोखंडे यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी अल्पशा आजाराने सोमवारी (दि.३) निधन झाले. प्रतिभा लोखंडे या सामाजिक, धार्मिक कार्यात नेहमीच अग्रेसर असत. त्यांच्या पश्चात मुलगा नरेंद्र, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा फार मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेला मालाठे पंचक्रोशीतील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील, नातेवाईक, मित्रपरिवार असा मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांचे दशक्रिया विधी बुधवार दि.१२ ऑगस्ट रोजी उद्धर पाली येथे सकाळी होणार आहे. तर उतरकार्य शुक्रवार दि.१४ ऑगस्ट रोजी राहत्या घरी मालाठे येथे होणार आहेत.

# स्वच्छतागृहाच्या उद्घाटनाला मुहूर्त कधी?

**नऊ महिन्यांपूर्वीच झाले लोकार्पण**
**महिलांसह ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय**

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**



श्रीवर्धन येथे वाढते पर्यटन या दृष्टीने समुद्र किनाऱ्यावर आलेल्या पर्यटकांची नैसर्गिक विधी बाबतीत कुचंबणा होऊ नये, याकरिता किनाऱ्यावर मठाचा गवंड परिसरात ॲस्पिरेशनल टॉयलेट उभारण्यात आले आहे. परंतु, सद्यस्थितीत शौचालय बंद अवस्थेत असल्याने आलेल्या पर्यटकांची नैसर्गिक विधीबाबतीत गैरसोय होतांना दिसत आहे.

पावसाळा सोडला तर अन्य वेळेला श्रीवर्धनचा समुद्रकिनारा पाहण्यासाठी व या ठिकाणी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी हजारो पर्यटक श्रीवर्धनला भेट देत असतात. मात्र, श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती आल्यावर त्या ठिकाणी स्वच्छतागृहाची सोय नसल्यामुळे अनेक महिलांचे व ज्येष्ठ नागरिकांचे प्रचंड हाल होतात. या ठिकाणी जुनी असलेली स्वच्छतागृहे मोडकळीस आल्याने स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत श्रीवर्धन समुद्रकिनारी अत्यंत सुसज्ज असे ॲस्पिरेशनल टॉयलेट बांधण्यात आले आहेत. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी या स्वच्छतागृहाचा लोकार्पण सोहळा राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे व रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला.

लोकार्पण होऊन नऊ महिने झाले तरीही श्रीवर्धन नगर परिषदेकडून या स्वच्छतागृहाचा वापर सुरू करण्यात आलेला नाही. अजून दीड महिन्यानंतर पावसाळा संपल्यानंतर पुन्हा श्रीवर्धनला पर्यटकांचा ओघ वाढणार आहे. सुट्ट्यांचा मोसम असल्यानंतर पर्यटकांची गर्दी दुप्पट ते तिप्पट प्रमाणात श्रीवर्धन समुद्रकिनारी होते. राज्यामध्ये पर्यटन व्यवसाय वाढीसाठी अनेक उपाययोजना राबविल्या जात असताना, श्रीवर्धन येथे स्वच्छतागृहाचे लोकार्पण होऊन देखील स्वच्छतागृहाचा वापर का सुरू करण्यात आलेला नाही, याबाबत संभ्रमाचे वातावरण आहे.

दरम्यान, श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर लोकार्पण झालेल्या स्वच्छतागृहाचे उद्घाटन करण्यासाठी श्रीवर्धन नगरपरिषद पंचांगात मुहूर्त पाहतेय का? अशी चर्चा नागरिकांमधून होताना पाहायला मिळत आहे.

### पार्किंगसाठी जागाच उपलब्ध नाही

येणाऱ्या आगामी काळामध्ये श्रीवर्धनसाठी सगळ्यात महत्त्वाची समस्या म्हणजे स्वच्छतागृहे व पार्किंग असणार आहे. कारण श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती वाहने पार्किंग करण्यासाठी जागाच उपलब्ध नाही. वनखात्याची जागा पार्किंगसाठी वापरण्याकरता, या ठिकाणाच्या लोकप्रतिनिधींकडे अनेकवेळा विनंती करून सुद्धा त्याबाबत कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप




**रसायनी :** हरिओम चॅरिटेबल ट्रस्टतर्फे रा.जि.प. प्राथमिक शाळा कांबे येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, स्पोर्ट्स ड्रेस, शूज तसेच स्वच्छता साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवर्ग आणि ग्रामस्थांच्या वतीने हरिओम चॅरिटेबल ट्रस्टचे सतीश, नयन तसेच ट्रस्टच्या सर्व संचालक मंडळाचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमाला रीस शाळेचे महेश म्हात्रे, हरिओम ट्रस्टचे खालापूर तालुक्यातील पदाधिकारी व सदस्य, तसेच शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

## गतिरोधकांवरील पांढरे पट्टे गायब

**| कोलाड | प्रतिनिधी |**

कोलाड-रोहा मार्गांवरील असंख्य ठिकाणी असलेल्या गतिरोधकांवरील सफेद-पिवळे पट्टे गायब झाले आहेत. यामुळे अंधारात गतिरोधक न दिसल्यामुळे अपघाताला निमंत्रण मिळत आहे. तसेच वाहन आदळत असल्याने वाहनचालकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

कोलाड-रोहा रस्त्यावर वाहनचालकांच्या वेगावर नियंत्रण रहावे, यासाठी या रस्त्याला डॉ. गांधी हॉस्पिटलपासून ठरविक अंतरावर गतिरोधक बसविण्यात आले आहेत. कोणत्या रस्त्याला गतिरोधक बसविणे बंधनकारक आहे. याबाबत काही नियम आखून देण्यात आले आहेत. कोलाड-रोहा मार्गांवरील




**अपघाताचा धोका**

विविध ठिकाणी गतिरोधक बसविण्यात आले आहेत. मात्र या गतिरोधकांवर सुरक्षिततेचा उपाय म्हणून रिफलेक्टर बसविले जात नाही. यामुळे रात्रीच्या वेळी अंदाज न आल्यामुळे अपघात होत आहेत.

कोलाड-रोहा मार्ग हा रोहा तालुक्याला जोडणारा मार्ग असून या मार्गांवर धाटाव येथे एम.आय. डी. कंपनी आहे. शिवाय मुरुड, अलिबागवरून भिरा ताम्हाणी मार्गी पुण्याकडे जाणारा राष्ट्रीय मार्ग आहे. यामुळे या मार्गांवर सतत वाहनांची वर्दळ सुरु असते. परंतु, या रस्त्याला असंख्य ठिकाणी बसविण्यात आलेल्या गतिरोधकांना सफेद व पिवळे पट्टे नसल्याने अपघात होतांना दिसत आहेत. तर दुचाकी चालवत असताना गतिरोधक दिसत नाही. यामुळे अपघात होण्याची देखील शक्यता असते. यामुळे गतिरोधकांना पांढरे व सफेद पट्टे लावून इतर उपाययोजना करावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

## सुभाष राठोड यांना मानाची संधी

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**



राजिप उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथील उपक्रमशील शिक्षक सुभाष रामचंद्र राठोड यांची भारत सरकारच्या सांस्कृतिक संसाधन आणि प्रशिक्षण केंद्र नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित ५१८व्या ओरिएंटेशन कोर्ससाठी निवड झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून निवड झालेल्या अवघ्या दहा शिक्षकांमध्ये त्यांचा समावेश झाल्याने रायगड जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

राठोड यांनी शाळेत विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवून रा.जि.प. शाळा वडगावचा कायापालट घडवून आणला आहे. विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, गुणवत्तावाढ आणि अभिनव उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी शाळेला यशाच्या नव्या उंचीवर नेले. त्यांच्या या कार्याची दखल घेत सीसीआरटी या प्रतिष्ठित राष्ट्रीय संस्थेने त्यांची प्रशिक्षणासाठी निवड केली आहे. हे प्रशिक्षण दि.४ ते २५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत नवी दिल्ली येथे होणार असून, देशभरातील निवडक शिक्षक त्यामध्ये सहभागी होणार आहेत. या प्रशिक्षणातून आधुनिक अध्यापन पद्धती, सांस्कृतिक शिक्षण आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक तंत्रांचा अभ्यास करून राठोड विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्याचा उपयोग करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



## स्टील मार्केटला डबल पार्किंगचा विळखा

**• वाहतूक कोंडीचा वाहनचालकांना फटका**

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी|**

कळंबोली स्टील मार्केट परिसरातील डबल पार्किंगची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून याचा फटका हजारो वाहनचालकांना बसत आहे. स्टील मार्केटमध्ये येणारे ट्रक, कंटेनर आणि इतर अवजड वाहने रस्त्याच्या दुतर्फा उभी राहत असल्याने मुख्य रस्ता अरुंद झाला आहे. परिणामी सकाळपासून सायंकाळपर्यंत वाहतुकीचा खोळंबा होत असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत.

स्टीलच्या मालाची चढ-उतार सुरू असताना अनेक वाहने रस्त्यावरच उभी केली जातात. त्यामुळे पनवेल, तळोजा, कळंबोली आणि मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक वारंवार ठप्प होत आहे. वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा वेळ व इंधनाचा अपव्यय होत असून रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या वाहनांनाही मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी वाहतूक पोलिसांनी या परिसरात नियमित गस्त वाढवून डबल पार्किंग करणाऱ्या वाहनांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच स्टील मार्केटमधील मालवाहू वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उभारल्यास वाहतूक कोंडीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल, असे मतही व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, वाढत्या वाहतूक कोंडीमुळे परिसरातील व्यापारी, वाहनचालक आणि नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून संबंधित प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालकाकडून केली जात आहे.

## सुजय सकपाळ यांच्या स्मरणार्थ रक्तदान, आरोग्य शिबीर

**• विविध मान्यवर, संस्थांचा होणार सन्मान**

**| पुणे | प्रतिनिधी |**




सुजय प्रतिष्ठान, मैत्री रक्ताची यांच्या वतीने सुजय सुरेश सकपाळ यांच्या १३व्या स्मृतीप्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबीर, आयुर्वेदिक आरोग्य तपासणी व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, दि.९ ऑगस्ट रोजी उद्यान मंगल कार्यालय, खजिना विहीर चौक, सदाशिव पेठ, पुणे येथे करण्यात आले आहे. याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत सुजय प्रतिष्ठानचे संस्थापक सुरेश सकपाळ यांनी दिली. याप्रसंगी रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथील ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांचाही सेवारत्न पुरस्काराने सत्कार होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पुणे श्रमिक पत्रकार भवन येथील पत्रकार परिषदेत प्रसिद्ध उद्योजक किसन भोसले, सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक भापोसे डॉ. विठ्ठल जाधव, सुजय प्रतिष्ठान मैत्री रक्ताचीचे संस्थापक सुधीर सकपाळ, उद्योजक सुनील मोरे उपस्थित होते.

या कार्यक्रमाप्रसंगी नागरिकांसाठी खुले रक्तदान शिबीर, मोफत आयुर्वेदिक आरोग्य तपासणी, अल्पदरात आयुर्वेदिक औषधांचे वितरण तसेच मोफत कांस्यथाळी मसाज यांची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याप्रसंगी समाजहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांचादेखील सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला प्रशासकीय, सामाजिक, वैद्यकीय, चित्रपट, पत्रकारिता, उद्योग, शिक्षण आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

**५०० चौ. फुटांपर्यंतचे घर विनामूल्य** | **अर्जासाठी ३१ डिसेंबर अंतिम मुदत**

# घर नियमितीकरणाबाबत मार्गदर्शन

**| मुंबई | प्रतिनिधी |**



शासकीय (कलेक्टर) जमिनीवरील १ जानेवारी २०११ पूर्वीच्या पात्र निवासी बांधकामांच्या नियमितीकरणासाठी राज्य सरकारने शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, पेणकर पाडा गावठाण समितीच्या वतीने प्रेमा लक्ष्मण विद्यालय येथे विशेष मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीदरम्यान शासन निर्णयातील मुख्य तरतुदी, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि पात्रतेचे निकष यांवर उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीत नागरिकाच्या शंकांचे शासन निर्णयानुसार निरसन करण्यात आले. मात्र, काही तांत्रिक मुद्द्यांवर शासकीय स्तरावरून अधिक स्पष्टता मिळणे आवश्यक असल्याने त्या प्रश्नांची स्वतंत्र यादी तयार करण्यात आली आहे. या संदर्भात गावठाण समिती लवकरच अपर तहसीलदारांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करणार आहे. त्यानंतर पुढील कृती आराखडा आणि अंतिम सूचना जाहीर केल्या जातील, असे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

शासनाच्या २५ मार्च २०२६च्या निर्णयानुसार, १ जानेवारी २०११ पूर्वी शासकीय जमिनीवर उभारलेली निवासी बांधकामे नियमितीकरणासाठी पात्र ठरणार आहेत. यासाठी मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कराची पावती आणि उपग्रह छायाचित्रे हे पुरावे म्हणून ग्राह्य धरले जातील. या योजनेनुसार ५०० चौ. फुटांपर्यंतचे निवासी क्षेत्र पूर्णपणे विनामूल्य नियमित केले जाईल. ५०० ते १५०० चौ. फुटांपर्यंतच्या अतिरिक्त बांधकामासाठी रेडिरेकनरनुसार बाजारमूल्याच्या १० टक्के शुल्क आकारले जाईल, तर १५०० चौ. फुटांपेक्षा जास्त असलेले अतिरिक्त बांधकाम नियमित केले जाणार नसून ते पाडले जाईल. तसेच, निवासी जागेचा काही भाग व्यावसायिक वापरासाठी असल्यास, त्या भागासाठी बाजारमूल्याच्या २५ टक्के शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२६ ही निश्चित करण्यात आली आहे.

### विशेष स्वयंसेवकांची नियुक्ती करणार

नागरिकांना अर्ज प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी समितीमार्फत विशेष स्वयंसेवकांची नियुक्ती केली जाणार आहे. हे स्वयंसेवक प्रत्यक्ष घरोघरी जाऊन अर्ज भरण्यास मदत करतील, कागदपत्रांची पूर्तता करून घेतील आणि नागरिकांना योग्य ते मार्गदर्शन करतील. याशिवाय २०२३ मध्ये झालेल्या टोपोग्राफी लँड सर्व्हे आणि गावठाण सीमांकनाचे नकाशे पात्र अर्जदारांना विनामूल्य उपलब्ध करून दिले जातील, अशी माहितीही या बैठकीत देण्यात आली.

## निवडक

### वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम



**रसायनी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते तथा मोहोपाडा-वासांबे ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य संदीप मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (दि.५) रसायनी-मोहोपाडा परिसरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, रसायनी परिसरातील रा.जि.प. शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप करण्यात आले. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी सरपंच उमा मुंढे यांच्यासह परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संदीप मुंढे यांनी वाढदिवस साजरा करताना समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

### किल्ले भिवगड येथे वृक्षारोपण



**नेरळ :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यातील किल्ले भिवगड येथे वृक्षारोपण करण्यात आले. शिवशंभो युवा हायकर्स संस्था कर्जत, भिवगड अखंड संवर्धन समिती गौरकामत, राजे प्रतिष्ठान कर्जत आणि परिक्षेत्र वन विभाग कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. भिवगडाच्या पायथ्याशी आणि गौरकामत स्मशानभूमी परिसर आणि सभोवताली एकूण २०० झाडे लावण्यात आली. भिवगडाच्या पायथ्याशी असलेल्या हनुमान मंदिरामध्ये वन क्षेत्रपाल समीर शिंदे, वनपाल चेतन डिंगोरे, शिवशंभो संस्थेचे अध्यक्ष विकास चित्ते, भिवगड अखंड संवर्धन समितीचे सचिव शाहीर गणेश ताम्हाणे, राजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भोईर, ज्येष्ठ पदाधिकारी समाधान पाटील यांच्या हस्ते पूजन करून वृक्षारोपण सुरू झाले. भिवगड संवर्धन समिती अध्यक्ष ॲड. योगेश देशमुख यांचा मोठा सहभाग होता. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी विविध भागातून एकूण ५३ विविध संघटनेचे सदस्य व परिक्षेत्र वनविभाग कर्जत यांच्या अधिनस्त असलेले ४० वन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




### माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**रसायनी :** प्राथमिक शाळा कोपर येथे सन-२००१ मधील इयत्ता चौथीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आनंदमयी वातावरणात कार्यक्रम साजरा केला. यावेळी शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक अनंत कोळी गुरुजी आणि सुरेखा म्हात्रे बाई यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच शाळेतील सर्व कार्यरत शिक्षकांनाही सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सन-२००१च्या रौप्यमहोत्सवी बॅचतर्फे शाळेला घड्याळे भेट देण्यात आली. शाळेबद्दलची आपुलकी आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा उपक्रम सर्वांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला. जुन्या मित्रमैत्रिणींशी भेट, शालेय आठवणी आणि शिक्षकांविषयीचा आदर अशा भावनिक वातावरणात हा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.

### प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान



**पाली :** मराठी पत्रकार परिषद संलग्नित रायगड प्रेस क्लबच्या माध्यमातून आणि सुधागड प्रेस क्लबच्या नियोजनाखाली, यावर्षीचा प्रगतशील शेतकरी सन्मान पुरस्काराने तालुक्यातील यशस्वी शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात आले. सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार, तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम आणि आरपीआय रायगड जिल्हा संपर्क प्रमुख राहुल सोनावळे, सुधागड प्रेस क्लबचे अध्यक्ष विनोद भोईर, कार्याध्यक्ष रवींद्रनाथ ओव्हाळ, रायगड प्रेस क्लब सह-खजिनदार निशांत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत भेरव येथे हा सोहळा पार पडला. यावर्षी तालुकयातील भेरव येथील दिपक भिमराव पवार, वाघोशी येथील गजानन श्रीपत देशमुख, पिलोसरी येथील मारुती यादव आणि कानसळ येथील अमोल कांबळे या प्रगतशील शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले. दिवंगत पत्रकार संतोष पवार यांच्या संकल्पनेतून आणि त्यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो. रायगड प्रेस क्लबच्या मार्गदर्शनाखाली सुधागड प्रेस क्लब गेली दहा वर्षे सातत्याने शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे आणि कृषी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घडवून आणण्याचे कौतुकास्पद कार्य करत आहे.

### 'स्नेहबंध' एकांकिका पुस्तकाचे प्रकाशन




**पनवेल :** कोकण मराठी साहित्य परिषद, पनवेल शाखा, सर्जनशील शब्दवेध साहित्य संघ, पनवेल आणि के. आ. बांठिया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यिक नंदकुमार शिंदे लिखित 'स्नेहबंध' या एकांकिकेच्या पुस्तकाचे प्रकाशन आणि भव्य कवी संमेलन उत्साहात पार पडले. ज्येष्ठ साहित्यिका ॲड. सुनिता जोशी यांच्या हस्ते, कवी-गझलकार व समीक्षक रोहिदास पोटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मान्यवरांच्या उपस्थितीत स्नेहबंध या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी २५ कवींनी स्व-रचित कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली. उत्कृष्ट काव्य सादरीकरणासाठी १० कवींचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान नागनाथ डोलारे, काशिनाथ जाधव आणि उत्तमराव तरकसे यांचा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला.

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | शुक्रवार । दि. ७ ऑगस्ट २०२६ । अंक ६२ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## सुनावणी पुढील आठवड्यात

**नवी दिल्ली :** शिवसेना कोणाची आणि धनुष्यबाण चिन्हावर कोणाचा अधिकार, या सत्तासंघर्षाशी संबंधित प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशी महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर उद्धव ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांच्या भूमिकेवर आक्षेप घेत युक्तिवाद केला. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता पुढील आठवड्यात होणार आहे.

## तरुण तेजपालला दहा वर्षांचा कारावास

**मुंबई :** तहलका मासिकाचे माजी संपादक तरुण तेजपाल यांना सहकारी महिलेवरील बलात्कार प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने दहा वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. तसेच २०२१ मध्ये गोवा सत्र न्यायालयाने दिलेला निर्दोष मुक्ततेचा निकाल रद्द करत त्यांना दोषी ठरविण्यात आले. हे प्रकरण नोव्हेंबर २०१३ मध्ये गोव्यातील थिंकफेस्ट कार्यक्रमादरम्यान घडले होते. कार्यक्रमासाठी आलेल्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये लिफ्टमध्ये दोन वेळा लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप पीडित महिलेने केला होता.

## वे|ध|क

### १.६० लाख गोविंदांना विमासंरक्षण

**मुंबई :** दहीहंडी उत्सवात मानवी मनोरे रचताना होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने यंदा राज्यातील १ लाख ६० हजार गोविंदांना विमा संरक्षण देण्याचा निर्णय राज्याच्या क्रीडा विभागाने घेतला आहे. दहीहंडीचे मनोरे रचताना अपघाती मृत्यू तसेच अपंगत्व आल्यास १० लाखांची मदत दिली जाणार आहे, त्याचप्रमाणे उपचारांसाठी १ लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. मागील वर्षी १ लाख ५० हजार गोविंदांना विमा संरक्षण देण्यात आले होते. गोविंदा पथकांची वाढती संख्या लक्षात घेऊन यंदा आणखी १० हजार गोविंदांना विमा संरक्षण देण्यात आले आहे. यासंदर्भातील शासन निर्णय क्रीडा विभागाने गुरुवारी काढला.

### एमडी ड्रग्जसह दोन तस्कर जेरबंद

**पनवेल :** खारघर पोलिसांनी अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या मोहम्मद अथर हुसॅन शमशाद हुसॅन अंसारी (२८) आणि अलत्मीम अवैश सिद्दीकी (२०) या सराईत तस्करांना अटक केली आहे. पोलिसांनी या आरोपींकडून तब्बल १४.११ ग्रॅम वजनाचे मेफेड्रोन (एमडी) तसेच मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि रोकड असा एकूण ४.३३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. खारघर पोलिसांचे पथक सेक्टर-३५ एफ भागात गस्त घालत असताना साई सिम्फनी सोसायटीसमोर मोहम्मद हुसॅन आणि अलत्मीम सिद्दीकी संशयास्पदरित्या आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेतली असता, हुसॅन अन्सारी याच्याजवळ पान ५ वर

### कारची ट्रेलरला धडक; एकाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेलजवळील नांदगाव पुलाजवळ भरधाव इको मोटारीने पुढील ट्रेलरला धडक दिल्याने मोटारीमधील सुशिल भायदे यांचा मृत्यू झाला. या अपघातानंतर ट्रेलरचालक घटनास्थळावरून फरार झाला असून, पनवेल शहर पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

तक्रारदार शिवम ठाकूर (२६) हे मारुती इको कारने पनवेलहून मुरुडकडे जात होते. त्यांच्या शेजारी सुशील भायदे बसले होते. नांदगाव पुलाजवळ पुढे जाणाऱ्या ट्रेलरचालकाने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक ब्रेक लावल्याने कार ट्रेलरवर आदळली. या धडकेत भायदे गंभीर जखमी झाले आणि काही वेळात त्यांचा मृत्यू झाला.

# घास रखडला, कारभार बिघडला!

## रायगडातील शाळांना तीन महिन्यांपासून धान्यपुरवठा नाही




**शिक्षण विभागाचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर**

**2,453 शाळा**

**82,930 विद्यार्थी**

**गणेश म्हाप्रळकर**
**। आंबेत ।**

रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होऊन तब्बल तीन महिने उलटले, तरी जिल्ह्यातील २ हजार ४५३ शाळांपैकी एकाही शाळेला पोषण आहारासाठी लागणाऱ्या धान्याचा पुरवठा झालेला नाही. त्यामुळे ८२ हजार ९३० विद्यार्थ्यांच्या पोषणाचा प्रश्न ऐरणीवर आला असून शिक्षक, पालक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांना लोकवर्गणीतून धान्य खरेदी करून विद्यार्थ्यांना जेवण देण्याची वेळ आली आहे.

पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना तांदूळ, मुगडाळ, तूरडाळ, वाटाणा, सोयाबीन वडी, मसाले आदी साहित्य पुरविणे अपेक्षित आहे. मात्र, मार्च महिन्यानंतर जिल्ह्यातील शाळांना एकदाही साहित्य मिळाले नसल्याचा आरोप शिक्षकांकडून करण्यात येत आहे. परिणामी, अनेक शाळांमध्ये शिक्षक आणि ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून धान्य गोळा करून विद्यार्थ्यांचा पोषण आहार सुरू ठेवला आहे, तर काही ठिकाणी दुकानदारांकडून उधारीवर साहित्य आणण्याची वेळ आली आहे.

विशेष म्हणजे, या गंभीर प्रश्नाकडे वारंवार लक्ष वेधूनही जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप होत आहे. एकीकडे विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध होत असताना विद्यार्थ्यांच्या मूलभूत पोषण आहारासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध होत नसल्याने पालक आणि शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

> पोषण आहाराचे साहित्य मिळत नसल्याने आम्हाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांचा आहार खंडित होऊ नये म्हणून शिक्षक, पालक आणि शाळा व्यवस्थापन समिती स्वतः च्या खिशातून पैसे खर्च करून धान्य खरेदी करत आहेत. शासनाने तातडीने साहित्य उपलब्ध करून द्यावे.
>
> **– पालक प्रतिनिधी**

> मार्च महिन्यात शेवटचा पोषण आहार मिळाला. त्यानंतर आजतागायत कोणतेही साहित्य आलेले नाही. त्यामुळे लोकवर्गणीतून जमा केलेल्या धान्यावर काटकसर करत विद्यार्थ्यांचा पोषण आहार सुरू ठेवत आहोत.
>
> **– अतिश भाटकर,** मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, खरसई

> पोषण आहाराबाबत तालुका स्तरावरून जिल्हा शिक्षण विभागाकडे तीन वेळा पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र, अद्याप साहित्याचा पुरवठा झालेला नाही. कोणताही विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहू नये, अशा सूचना सर्व शाळांना दिल्या आहेत.
>
> **– नवनाथ साबळे, गटशिक्षणाधिकारी, म्हसळा**

> पोषण आहार पुरवठ्यात नेमक्या कोणत्या त्रुटी आहेत, याची तातडीने माहिती घेणार आहे. हा प्रश्न जिल्हा परिषद सभागृहात उपस्थित करून संबंधित अडचणी दूर करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल.
>
> – बबन मनवे, सभापती, पंचायत समिती, म्हसळा

# डॉक्टरांच्या आंदोलनाला तीव्र वळण

## प्रलंबित मागण्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन




**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील आरोग्य व्यवस्थेशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवरून डॉक्टरांच्या आंदोलनाने आता अधिक तीव्र स्वरूप धारण केले आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) महाराष्ट्र, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (MARD), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (ASMI) तसेच विविध स्पेशालिस्ट संघटनांनी आंदोलनात संयुक्तपणे सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर आयएमए अलिबागतर्फे रायगड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

आयएमए अलिबागचे अध्यक्ष डॉ. विनायक पाटील यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टरांच्या शिष्टमंडळाने शासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. संयुक्त निवेदनात BHMS-CCMP नोंदणी प्रक्रिया, निवासी डॉक्टरांच्या सेवा, प्रशिक्षण व कल्याणाशी संबंधित प्रश्नांवर शासनाकडून अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

डॉक्टर संघटनांच्या मते, स्पष्ट कायदेशीर व नियामक चौकटीचा अभाव आणि शासनाकडून समाधानकारक हमी न मिळाल्यामुळे डॉक्टरांमध्ये असंतोष वाढला आहे. याचा परिणाम रुग्णांच्या सुरक्षिततेवर, वैद्यकीय पान ५ वर

### न्यायालयीन सुनावणीकडे लक्ष

दरम्यान, डॉक्टरांच्या आंदोलनासंदर्भात महत्त्वाची घडामोड घडण्याची शक्यता असून, या प्रकरणाची मुंबई उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतल्याची माहिती डॉक्टर संघटनांमध्ये प्रसारित झाली आहे. दरम्यान, गुरुवारी होणाऱ्या सुनावणीवर राज्यातील डॉक्टर, रुग्ण आणि आरोग्य क्षेत्राचे लक्ष लागले होते. त्यानुसार न्यायालयाच्या निर्देशानंतर संप अखेर मागे घेण्यात आला आहे.

## मोटारसायकलस्वार अपघातात ठार



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूरनजीकच्या कशेडी घाटामध्ये मंगळवारी रात्री खेडकडे जाणाऱ्या भरधाव यामाहा मोटरसायकलची घाटरस्त्यालगतच्या रेलिंगला जोरदार धडक बसली. अपघातामध्ये मोटरसायकलस्वार जागीच ठार झाला.

महाड तालुक्यातील वाळण झोळीचा कोंड येथील रहिवाशी तरुण राज विनोद मोरे (२३) हा त्याच्या ताब्यातील यामाहा कंपनीची आर१५ मोटर सायकल (क्रमांक एम एच०६ सीएस २५९४) घेऊन मंगळवार दि. ४ जुलै रोजी रात्री महाडकडून खेडच्या दिशेने जात असताना कशेडी घाटातील चोळई गावच्या हद्दीत सायली पान ५ वर

# आरोग्यसेवा कोलमडली

## उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टरांची वानवा




**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांसह दक्षिण रायगड आणि शेजारील रत्नागिरी जिल्ह्यातील हजारो नागरिकांसाठी महत्त्वाचे असलेले माणगाव उपजिल्हा रुग्णालय तज्ज्ञ डॉक्टरांच्या तीव्र कमतरतेमुळे अडचणीत सापडले आहे. शासनाने १०० बेडचे अत्याधुनिक रुग्णालय उभारले असले, तरी उपचारासाठी आवश्यक असलेले तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

रुग्णालयासाठी १५ कायमस्वरूपी तज्ज्ञ डॉक्टरांची पदे मंजूर असतानाही वैद्यकीय अधीक्षक, जनरल सर्जन, स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, फिजिशियन, बालरोगतज्ज्ञ, अस्थिरोगतज्ज्ञ आणि दंततज्ज्ञ यांसारखी महत्त्वाची पदे गेल्या दोन ते तीन वर्षांपासून रिक्त आहेत. परिणामी गंभीर रुग्णांवर तातडीने उपचार करणे कठीण होत आहे.

नेत्रतज्ज्ञाची नियुक्ती असूनही त्यांची प्रतिनियुक्ती महाड उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आल्याने माणगावच्या रुग्णांना त्या सेवेपासून वंचित राहावे लागत आहे. वैद्यकीय अधीक्षकाचे पदही रिक्त असून प्रभारी स्वरूपात कारभार सुरू आहे. अपघात विभागातील चार सीएमओ पदेही केवळ ११ महिन्यांच्या करारावर भरली गेली आहेत.

रुग्णालयात पान ५ वर

# शेतजमिनीत रसायनमिश्रित द्रव्य

- **नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**
- **प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तपासणीसाठी नमुने**

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यातील निगुडशेत येथील शेतजमिनीलगतच्या रस्त्याच्या कडेला काळ्या रंगाचे संशयास्पद रासायनिक द्रव्य आढळून आल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी स्वाती पाटील यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या महाड उपप्रादेशिक कार्यालयाकडे रसायनाची वैज्ञानिक तपासणी करण्यासाठी अधिकृत पत्र पाठविले आहे.

निगुडशेतचे पोलीस पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनंतर ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत संयुक्त पंचनामा केला. पंचनाम्यात रस्त्याच्या कडेला काळ्या रंगाचे संशयास्पद रासायनिक द्रव्य आढळल्याची नोंद करण्यात आली असून, त्याचा अहवाल तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.

त्यानंतर तहसीलदार स्वाती पाटील यांनी पंचनाम्याची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड कार्यालयाकडे पाठवून संबंधित रसायनाची तपासणी करण्याची विनंती केली आहे. तपासणीनंतर हे द्रव्य नेमके कोणते आहे, त्याचा पर्यावरण व मानवी आरोग्यावर काय परिणाम होऊ शकतो, तसेच ते तेथे कोणी आणि कोणत्या उद्देशाने टाकले, याचा उलगडा होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, शेतीच्या परिसरात असे संशयास्पद रसायन आढळल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. याबाबतचा अधिकृत अहवाल आल्यानंतरच अधिकची माहिती देण्यात येणार असल्याचे तहसीलदार स्वाती पाटील यांनी सांगितले. प्रशासन नेमकी काय भूमिका घेतेय, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

## पळसदरीजवळ भीषण अपघात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील कर्जत-खोपोली (महामार्ग क्र. ५४८-अ) वरील पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठाजवळ गुरुवारी सकाळी सुमारे आठच्या सुमारास वॅगनार कार आणि दुचाकीमध्ये झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील एका महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर दुचाकी चालक गंभीर जखमी झाला. या दुर्घटनेनंतर अपूर्ण रस्ता आणि अपुऱ्या सुरक्षाव्यवस्थेबाबत नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खोपोलीतील ताकई परिसरातील मित्रांचा गट माथेरानकडे जात होता. पान ५ वर

# तळा शहरातील डम्पिंग ग्राऊंड धोकादायक



**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा शहरातून कचरा टाकणे बंद झाले असले, तरी जुन्या डम्पिंग ग्राऊंडवरील वर्षानुवर्षे साचलेला कचरा अद्यापही तसाच पडून आहे. त्यामुळे या ठिकाणाहून दुर्गंधी पसरत असून, डास, माशा आणि विविध जंतूंचे प्रमाण वाढले आहे. परिणामी, परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

तळा नगरपंचायतीने घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार शहरातील आंबेळी येथे नवीन ठिकाणी कचरा टाकण्यास सुरुवात केली आहे. मात्र, नवीन डम्पिंगची व्यवस्था झाली असली तरी जुन्या कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न अद्याप कायम आहे. जुन्या डम्पिंग ग्राऊंडवर प्लास्टिक, ओला कचरा तसेच वैद्यकीय कचरा एकत्रितपणे अनेक वर्षांपासून साचून राहिला आहे.

पावसाळ्यात या पान ५ वर

> तळा शहरातील जुन्या डम्पिंग ग्राऊंडवरील कचरा उचलण्यासाठी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत दोन लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. पावसाळा संपल्यानंतर तातडीने कचरा उचलण्याच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.
>
> **– राकेश पाटील, स्वच्छता निरीक्षक, तळा नगरपंचायत**






**राख्यांच्या किमतीत दहा टक्क्यांनी वाढ** | **साहित्य महागल्याने बहिणींच्या खिशाला कात्री**

# रक्षाबंधनावर महागाईचा फटका



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेमाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, रायगड जिल्ह्यातील बाजारपेठा रंगीबेरंगी राख्यांनी सजू लागल्या आहेत. मात्र, यंदा या सणावर महागाईचे सावट पडले आहे. राखी तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या दरात वाढ झाल्याने यंदा राख्यांच्या किमतीत सुमारे दहा टक्क्यांची वाढ झाली आहे. त्यामुळे बहिणींना राखी खरेदीसाठी यंदा अधिक खर्च करावा लागणार आहे.

यंदा २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन साजरे होणार असून, जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील बाजारपेठांमध्ये राखी विक्रीची दुकाने सजली आहेत. लहान मुलांपासून तरुणांपर्यंत सर्वांच्या पसंतीच्या विविध आकर्षक राख्या बाजारात उपलब्ध झाल्या आहेत. स्टोन राखी, खडा राखी, डबी राखी, लटकन, गोंडा राखी, मोर, स्वस्तिक, कासव, गणपती, मेरे भैया, जय श्रीराम तसेच स्पायडरमॅन आणि मोटू-पतलू अशा विविध प्रकारच्या राख्यांना यंदा विशेष मागणी आहे.

### बाजारात उपलब्ध राख्यांचे प्रकार

स्टोन राखी, खडा राखी, डबी राखी, लटकन, गोंडा राखी, मोर, स्वस्तिक, कासव, गणपती, जय श्रीराम, स्पायडरमॅन, मोटू-पतलू, घड्याळ, राखी, सिल्व्हर, प्लेटेड राखी.

### महागाईचा परिणाम

राख्यांच्या किमतीत सुमारे १० टक्के वाढ. कच्च्या मालाच्या दरात वाढ. मोती, मेटल व सजावटीचे साहित्य महागले. बहिणींना राखी खरेदीसाठी यंदा अधिक खर्च करावा लागणार.

विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार, मोती, मेटल, गोंडे आणि सजावटीच्या साहित्याच्या किमती वाढल्यामुळे राखी उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. परिणामी, गतवर्षी पाच ते सहा रुपयांत मिळणाऱ्या अनेक राख्या यंदा अधिक दराने विकल्या जात आहेत. पान ५ वर

# कोकणाचे नष्टचर्य

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा फायदा कोणत्या जिल्ह्यात किती लोकांना होणार आहे याची आकडेवारी मध्यंतरी जाहीर झाली. त्यानुसार, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग यांमध्ये कर्जमाफी घेणाऱ्यांची संख्या जेमतेम काही हजार आहे. तर जेमतेम सिंधुदुर्गाइतकेच आकारमान असलेल्या जालना जिल्ह्यातून तब्बल एक लाख ७५ हजार शेतकरी यासाठी पात्र ठरले आहेत. शेजारच्या परभणीतून ७१ हजार तर लातूरमधून ५४ हजार शेतकरी माफी घेणार आहेत. अहिल्यानगरने तर विक्रम नोंदवलेला आहे. तिथे तब्बल १ लाख ९२ हजार शेतकरी कर्जे माफ करून घेणार आहेत. या शेतकऱ्यांमधील खरे गरजू किती आणि बनावट लाभार्थी किती हे ठरवणे अवघड आहे. आता राज्यातील १ लाख ४० हजार शेतकरी अपात्र ठरल्याचे सरकारने जाहीर केले आहे. त्यातले ९४ हजार प्राप्तिकर भरणारे तर इतर जवळपास ४६ हजार अन्य कारणांमुळ अपात्र ठरणारे असे आहेत. सरकारच्या तिजोरीत ख़डखडाट आहे व पाणी अगदी नाकातोंडाशी जायची वेळ आली आहे, म्हणूनच यंदा इतके काटेकोर निकष लावण्यात आले. अन्यथा, हे शेतकरी देखील कर्जाची माफी घेऊन मोकळे झाले असते. पण मूळ मुद्दा त्याचा नाही. मूळ मुद्दा कोकण व इतर भागातील तफावतीचा आहे. इतर भागांमध्ये अवर्षण, दुष्काळ, शेतमालाचे भाव पडणे यांचा तीव्र फटका बसून मोठे नुकसान होते हे खरे आहे. त्या भागात गरिबीचे प्रमाणही अधिक आहे. कोकणाला मुंबईचा सहारा, आसरा, आधार सर्व काही आहे. त्यामुळे मुंबईतून बराच पैसा पूर्वापार कोकणात येतो. अलिकडे तेथे फळबागा योजनेतून आंब्याच्या व इतर फळांच्या बागा फुलल्या आहेत. तरीही हा एकूण नीतीमत्तेचा प्रश्न आहे. आजवर दुष्काळ किंवा अतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान झाले की इतर भागांना मोठी मदत मिळते. मात्र फयान किंवा अन्य कोणत्याही चक्रीवादळांनी कोकणाला कितीही झोडपले तरी इतकी तुटपुंजी मदत केली जाते की ते पैसे घेणाऱ्यालाच लाज वाटावी. गेल्या वेळी सुपारी बागायतदारांना दोनशे-पाचशे मदतीचे चेक आल्याची उदाहरणे आहेत.

## लाचारी नाही, राजकारण नाही

कोकणातील शेतकरी मुळात कर्जे घेण्याच्या फंदात पडत नाही. पडलाच तर तो अत्यंत नेमाने ती फेडून टाकतो. हे पूर्वी शरद पवार यांनीही अनेकदा जाहीरपणे सांगितले आहे. पण त्याच्या याच प्रामाणिकपणामुळे तो राजकारण्यांच्या उपयोगाचा ठरत नाही. नगरसारख्या भागामध्ये दोन लाख कर्ज प्रकरणे होतात याचे कारण तिथल्या राजकीय कार्यकर्त्यांचा त्यात फायदा असतो. याच भागात सहकारी बँका व पतपेढ्यांचे जाळे आहे. आधी या बँकांकडून कर्ज घ्यायला मदत करायची. नंतर ते माफ करायला मदत करायची. आणि हे करताना त्या तालुक्याचे दादा, तात्या, रावसाहेब आमदार किंवा नेते यांच्या उठसूठ पाया पडायला जायचे. त्यांना मोठे करायचे. मधल्या मध्ये आपलाही गाळा काढून घ्यायचा, असे हे सगळे राजकारण आहे. राजकीय नेत्यांच्या मेहरबानीची अशी गरज पडत असल्याने शेतकरी लाचार राहतात. कोकणात ही स्थिती कमी असते. त्यामुळे वारंवार राजकीय नेत्यांचे पाय धरायला लोक जात नाहीत. परिणामी इथे घाटावरच्या सारखे लाचारीवर आधारलेले राजकारणही उभे राहत नाही. अशा लोकांवर खात्रीशीर मतदार म्हणून भरवसा ठेवता येत नाही. कारण ते स्वतःच्या मनाने व मताने मतदान करण्याची शक्यता असते. यामुळे अशा न विसंबता येण्यासारख्या कोकणाकडे आजवर राज्यातले राजकारणी व महाराष्ट्र सरकारने कायम दुर्लक्ष केले आहे. कर्जमाफीमध्ये राज्यातील सर्वात कमी म्हणजे तीन हजार शेतकरी सिंधुदुर्गातले आहेत. तर रत्नागिरी व रायगडमधले सात व साडेसात हजार लोक आहेत. इतर जिल्ह्यांची सरासरी याच्या दुप्पट वा तिप्पट आहे. याचा अर्थ हे शेतकरी व यांचा एकूण शेती धंदा यातून राजकारण्यांना आपला लाभ करून घेण्याची शक्यता मर्यादित होते. याचे दृश्य परिणाम सर्वत्र दिसतात. कोकणाचा आजवर न झालेला विकास आणि मुंबई ते गोवा मार्गाचे रखडलेले काम ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. मुंबई गोवा मार्गाचे रडगाणे गेल्या वीस वर्षांपासून चालू आहे. त्यात यंदा केवळ नवी भर पडली आहे.

## माणगावातली फसवणूक

यंदा पावसाच्या आरंभी सरकारने असे जाहीर केले की, माणगाव आणि इंदापूरच्या बाह्यवळणाच्या निदान एका बाजूचे काम गणेशोत्सवापूर्वी पूर्ण केले जाईल. यामुळे कोकणवासी आनंदले होते. कारण, कोकणात जाताना याच दोन ठिकाणी सर्वाधिक वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. या दोन्ही ठिकाणी महामार्ग नावाचा रस्ता बाजारपेठेतून जातो. परिणामी त्याच्या विस्ताराला जागाच उरलेली नाही. त्यातूनच दोन्हीकडे पार्क केलेल्या वाहनांमुळे रस्ता आणखी कमी होतो. यामुळे दहा मिनिटांच्या अंतरासाठी अक्षरशः लोक तास न तास गाडीत बसून वाट पाहतात. सरकारने घोषणा केली तरीही लोकांना शंका होतीच. ती आता खरी ठरली आहे. हे बाह्यवळणाचे काम यंदाही पूर्ण होणार नाही असे आता अधिकाऱ्यांनी कबूल केले आहे. त्यांनी हे काम होण्यासाठी डिसेंबरला नवा वायदा केला आहे. पण त्यावरही विश्वास ठेवावा अशी स्थिती नाही. यापूर्वी सरकार तर सोडाच खुद्द नितीन गडकरी यांनी शेकडो वेळा मुंबई गोवा मार्गाबाबत असेच वायदे केले व शेवटी आपण कंत्राटदारांपुढे हात टेकले असे ते सांगतात. विशेष म्हणजे वर्षानुवर्षे हे हाल होत असूनही कोकणात गणपतीसाठी गाड्या भरभरून घेऊन जाण्याचे लोकांचे वेड काही कमी होत नाही. कारण, हा त्यांचा महत्वाचा सण आहे. पण यासाठी या काळात होणाऱ्या त्रासाबाबत ते तात्पुरते सरकारला शिव्या घालतात. आता समाजमाध्यमे हाताशी असल्याने लोक याबाबत फेसबुकवर लिहितात किंवा ट्विटरवर तेव्हापुरते फोटो टाकतात. पण गणपती झाले की हा सर्व त्रास विसरला जातो. यामुळेच सरकारचे फावलेले आहे. त्यांना लोकांची कसलीच भीती वाटेनाशी झाली आहे. कोकणाच्या लोकांना गृहित धरण्याचे उद्योग सुरू आहेत. याला जंतरमंतरसारखे एखादे आंदोलन करूनच सरकारला दणका देण्याची गरज आहे. रायगड जिल्ह्यातील रस्त्यांची ही कामे का रेंगाळली आहेत याचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण दिले जात नाही. एकीकडे सरकार मिसिंग लिंकसारखे अवघड काम विक्रमी वेळात पूर्ण केले म्हणून स्वतःची टिमकी वाजवते. तर दुसरीकडे कोकण व मुंबईला जोडणाऱ्या रस्त्याकडे मात्र राजेशाही दुर्लक्ष करते. कोकणी जनता आपल्याला काहीही धक्का लावू शकत नाही याची या राज्यकर्त्यांना खात्री आहे. गंमत म्हणजे जेव्हा केव्हा पाच दहा वर्षांनी मुंबई गोवा मार्ग पूर्ण होईल तेव्हा त्याचे श्रेय घेण्यासाठी मात्र सध्याचे राज्यकर्ते पुढे येतील. आमच्याच मुळे हे झाले असा प्रचार करतील. त्यासाठी शेकडो कोटी रुपये खर्च करायला मागेपुढे पाहणार नाहीत. कोकणाचे हे नष्टचर्य संपवायचे असेल तर कोकणी जनतेला जागे व्हायला हवे. संघटित होऊन आवाज उठवायला हवा. सरकारच्या खुर्चीला आपण धक्का देऊ शकतो हे दाखवायला हवा.

**विचार**

# राष्ट्राच्या सुरक्षेचा अदृश्य आधारस्तंभ

*राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार राष्ट्राच्या सुरक्षिततेचे अदृश्य शिल्पकार असतात. स्वतः रणांगणावर लढत नसले, तरी ते रणनीती ठरवतात. गुप्तचर माहितीचे विश्लेषण करून राष्ट्रीय निर्णयांना आकार देतात. परराष्ट्र धोरण, संरक्षण, अंतर्गत सुरक्षा आणि तांत्रिक स्वावलंबन यांचा समन्वय साधणारे ते प्रमुख सल्लागार ठरतात. अजित डोवाल यांना यंदाचा प्रतिष्ठेचा लोकमान्य टिळक पुरस्कार मिळाल्यामुळे घेतलेला या यंत्रणेच्या कार्याचा वेध.*

**शिवाजी कराळे**



देशाच्या सीमांवर उभा असलेला सैनिक हा राष्ट्राच्या सुरक्षेचे दृश्यमान प्रतीक असतो; पण त्या सैनिकामागे धोरण, गुप्तचर माहिती, संरक्षण नियोजन, परराष्ट्र संबंध, सायबर सुरक्षा, दहशतवादविरोधी रणनीती आणि राजकीय निर्णय यांचा गुंतागुंतीचा धागा विणण्याचे काम राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार करतो. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हे पद केवळ एका अधिकाऱ्याचे नसून देशाच्या सुरक्षा व्यवस्थेतील सर्वात महत्त्वाच्या संस्थात्मक केंद्रांपैकी एक आहे. आजचे युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही. ते सायबर स्पेसमध्ये, अर्थव्यवस्थेत, माहितीच्या क्षेत्रात, तंत्रज्ञानात, समुद्री मार्गांवर आणि अंतराळातही लढले जाते. अशा परिस्थितीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराचे महत्त्व अनेक पटींनी वाढले आहे. पंतप्रधानांचे प्रमुख सुरक्षा सल्लागार म्हणून ते राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयात सहभागी असतात. संरक्षण दल, गुप्तचर संस्था, परराष्ट्र मंत्रालय, गृह मंत्रालय आणि विविध सुरक्षा यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय घडवून आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हा पंतप्रधान आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषद यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतो. देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेचा सातत्याने आढावा घेणे, उद्‌भवणाऱ्या धोक्यांचे विश्लेषण करणे आणि त्यावर योग्य पर्याय सरकारसमोर मांडणे, ही त्यांची प्रमुख भूमिका असते. पारंपरिक युद्धाचा काळ आता मागे पडत चालला आहे. त्याऐवजी हायब्रिड वॉरफेअर, सायबर हल्ले, ड्रोनद्वारे घुसखोरी, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, आर्थिक निर्बंध, 'सोशल मीडिया'वरील दिशाभूल करणारे प्रचार आणि जैविक धोके अशी अनेक नवी आव्हाने समोर आली आहेत.

या प्रत्येक विषयासाठी वेगवेगळ्या मंत्रालयांची जबाबदारी असली, तरी त्यांचे एकत्रित धोरण तयार करण्याचे काम राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांकडे असते. भारतीय शासनव्यवस्थेत अनेक संस्था राष्ट्रीय सुरक्षेसाठी कार्यरत असतात. लष्कर, नौदल, हवाई दल, गुप्तचर संस्था, राष्ट्रीय तपास यंत्रणा, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव पोलिस दल, परराष्ट्र मंत्रालय, गृह मंत्रालय, संरक्षण मंत्रालय अशा अनेक विभागांचा सहभाग असतो. या सर्व यंत्रणांनी स्वतंत्रपणे काम केले, तर माहितीची देवाणघेवाण आणि निर्णयप्रक्रिया संथ होऊ शकते. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार ही सर्व यंत्रणा एका समान उद्दिष्टासाठी काम करणारी साखळी असते. कोणत्याही संकटाच्या वेळी सर्व संबंधित विभागांकडून माहिती गोळा करून पंतप्रधानांपर्यंत पोहोचवणे आणि त्यानुसार तातडीचे निर्णय घेण्यासाठी आवश्यक सल्ला देणे, ही त्यांच्यावरील महत्त्वाची जबाबदारी असते. युद्धजन्य परिस्थिती, सीमावाद, दहशतवादी हल्ले, परदेशातील भारतीय नागरिकांची सुटका, मोठे सायबर हल्ले किंवा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित संवेदनशील घडामोडी अशा प्रत्येक प्रसंगी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचा समन्वय अत्यंत निर्णायक ठरतो. आज राष्ट्रीय सुरक्षेची व्याख्या मोठ्या प्रमाणात बदलली आहे. पूर्वी संरक्षण म्हणजे केवळ सैन्यशक्ती असे मानले जात होते; मात्र आता ऊर्जा सुरक्षा, अन्न सुरक्षा, जलसुरक्षा, आर्थिक स्थैर्य, तंत्रज्ञानातील आत्मनिर्भरता, सेमीकंडक्टर, महत्त्वाच्या खनिजांचा पुरवठा, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सुरक्षा आणि सायबर संरक्षण हेही राष्ट्रीय सुरक्षेचे महत्त्वाचे भाग बनले आहेत.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांना केवळ संरक्षण क्षेत्राची माहिती असून चालत नाही, तर अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण, विज्ञान-तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय कायदे, गुप्तचर विश्लेषण, सायबर तंत्रज्ञान आणि भू-राजकारण यांचेही सखोल ज्ञान आवश्यक असते. देशातील विविध गुप्तचर संस्था सातत्याने माहिती गोळा करत असतात; मात्र माहिती मिळवणे आणि तिचा योग्य अर्थ लावणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. हजारो अहवालांमधून खरा धोका ओळखून सरकारला योग्य वेळी सावध करणे ही अत्यंत जबाबदारीची भूमिका राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पार पाडतात. वेळेवर मिळालेली अचूक माहिती अनेक मोठे हल्ले रोखू शकते. उलट, चुकीच्या विश्लेषणामुळे राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हे केवळ माहितीचे वाहक नसून धोरणात्मक विश्लेषक असतात. आज जागतिक राजकारणात सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण यांच्यातील सीमा जवळपास नाहीशी झाली आहे. चीन, पाकिस्तान, हिंद-प्रशांत क्षेत्र, दहशतवाद, समुद्री सुरक्षा, क्वाड, ब्रिक्स, शांघाय सहकार्य संघटना, पश्चिम आशियातील संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेवरील जागतिक स्पर्धा अशा अनेक विषयांमध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार सक्रिय भूमिका बजावताना दिसतात. अनेक संवेदनशील चर्चा, पडद्यामागील वाटाघाटी आणि धोरणात्मक संवाद यामध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचा सहभाग असतो. अनेक वेळा औपचारिक राजनैतिक चर्चांपेक्षा अशा संवादातून अधिक महत्त्वाचे निर्णय आकार घेतात.

डिजिटल युगात सायबर हल्ले हे युद्धाचे प्रभावी शस्त्र बनले आहेत. बँकिंग व्यवस्था, वीजपुरवठा, विमानतळ, रेल्वे, संरक्षण नेटवर्क, उपग्रह व्यवस्था आणि सरकारी डेटाबेस यांच्यावर होणारे सायबर हल्ले देशाला मोठ्या संकटात टाकू शकतात. याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम संगणक, ड्रोन, स्वायत्त शस्त्रप्रणाली, डीपफेक आणि माहिती युद्ध ही नवी आव्हाने आहेत. या सर्व विषयांवर दीर्घकालीन राष्ट्रीय धोरण तयार करण्यामध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली आहे. भारताला अनेक दशकांपासून सीमापार दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी केवळ लष्करी कारवाई पुरेशी नसते. त्यासाठी आर्थिक नेटवर्कवर कारवाई, आंतरराष्ट्रीय सहकार्य, गुप्तचर माहितीची देवाणघेवाण, सीमा व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनाशी समन्वय आवश्यक असतो. या सर्व घटकांना एकत्र आणून व्यापक दहशतवादविरोधी धोरण तयार करण्यामध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार महत्त्वाची भूमिका बजावतात. कोणतेही राष्ट्रीय संकट अचानक निर्माण होते. त्या वेळी निर्णय घेण्यासाठी वेळ फार कमी असतो. अशा वेळी विविध मंत्रालये आणि सुरक्षा संस्थांमधील समन्वय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार संकटाच्या काळात परिस्थितीचा सतत आढावा घेतात, पर्यायांचे मूल्यमापन करतात आणि पंतप्रधानांना निर्णयासाठी आवश्यक माहिती उपलब्ध करून देतात. त्यामुळे निर्णय जलद आणि माहितीपूर्ण होण्यास मदत होते.

अमेरिका, ब्रिटन, इस्रायल, जपान, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स यांसारख्या देशांमध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचे पद अत्यंत प्रभावशाली मानले जाते. जागतिक सुरक्षेचे बदलते स्वरूप पाहता भारतातही या पदाचे महत्त्व सातत्याने वाढले आहे. भारताची अर्थव्यवस्था जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनत असताना, हिंद महासागरातील वाढते सामरिक महत्त्व, चीनची आक्रमक भूमिका, दहशतवाद, सायबर युद्ध, अवकाश तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील स्पर्धा यामुळे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांना पूर्वीपेक्षा अधिक व्यापक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत आहेत. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचे पद प्रभावी असले, तरी त्याभोवती मजबूत संस्थात्मक व्यवस्था असणे तितकेच आवश्यक आहे. विविध मंत्रालयांमध्ये माहितीची देवाणघेवाण अधिक वेगवान होणे, डेटा विश्लेषणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सायबर सुरक्षेतील तज्ज्ञांची उपलब्धता, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित धोका विश्लेषण, राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे संशोधन अधिक सक्षम करणे आणि दीर्घकालीन सुरक्षा नियोजनासाठी स्वतंत्र अभ्यास व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ सरकारची जबाबदारी नसून उद्योग, संशोधन संस्था, तंत्रज्ञान क्षेत्र, विद्यापीठे आणि नागरिक यांचाही त्यात सहभाग असणे गरजेचे आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनी या सर्व घटकांना जोडणाऱ्या राष्ट्रीय चौकटीला अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे.

एकविसाव्या शतकात राष्ट्रीय सुरक्षेचे स्वरूप जितके गुंतागुंतीचे होत आहे, तितकेच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचे महत्त्व वाढत आहे. भविष्यात युद्धे सीमांवर कमी आणि माहिती, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर विश्वात अधिक लढली जातील. अशा काळात देशाच्या सर्व सुरक्षा घटकांना एका समान राष्ट्रीय उद्दिष्टासाठी जोडणारा, संकटात शांतपणे निर्णयप्रक्रियेला दिशा देणारा आणि दीर्घकालीन राष्ट्रीय हिताचा विचार करणारा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हा भारताच्या सुरक्षा व्यवस्थेचा केवळ एक अधिकारी नसून राष्ट्राच्या सामरिक क्षमतेचा प्रमुख आधारस्तंभ आहे. त्यांचे योगदान जितके प्रभावी आणि संस्थात्मकदृष्ट्या सक्षम असेल, तितकी भारताची सुरक्षा अधिक सुदृढ, सक्षम आणि भविष्योन्मुख राहील.

**चर्चा आजची**

# युद्ध नव्हे तर शांतता हे मानवतेचे भविष्य

**सुयोग आंग्रे**

हिरोशिमा दिन ६ ऑगस्ट रोजी जगभरात साजरा केला जातो. हा तो दिवस आहे जेव्हा अमेरिकेने १९४५ साली जपानमधील हिरोशिमा शहरावर पहिला अणुबॉम्ब टाकला होता. या दिवशी हल्ल्यात मारल्या गेलेल्या लोकांना श्रद्धांजली वाहिली जाते आणि शांतता, अण्वस्त्र निःशस्त्रीकरण आणि मानवतेचा संदेश दिला जातो.

आजही, जवळजवळ आठ दशकांनंतर, हा दिवस केवळ युद्धाचा इतिहास नाही, तर इतिहासात पुन्हा एक संधी आहे. सध्याचे जग आज सर्वत्र युद्ध, संघर्ष आणि तणावाचे वातावरण आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील इराण-इस्रायल तणाव, गाझा संघर्ष आणि इतर प्रादेशिक वाद जागतिक शांततेसाठी गंभीर आव्हाने बनली आहेत.

खरे तर युद्ध हा कोणत्याही समस्येवर कायमस्वरूपी उपाय नसून तो नवीन समस्यांना जन्म देतो. शांतता हे मानवतेचे सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे. भगवान गौतम बुद्धांच्या शिकवणीतही आपल्याला हाच संदेश सापडतो.

धम्मपदातही म्हटले आहे 'न हि वेरेण वेराणी समंतिध कुडाचन. अवरेन च समंती, स धम्मो सनातनो ।' म्हणजेच या जगात शत्रुत्व कधीच संपत नाही; प्रेम, करुणा आणि अहिंसेनेच शत्रुत्व संपते. हे शाश्वत सत्य आहे. सत्य हे आहे की गौतम बुद्धांचा हा संदेश आजच्या युद्धग्रस्त जगात पूर्वीपेक्षा अधिक समर्पक वाटतो. संघर्षाचा प्रकार कोणताही असो, त्याची सर्वाधिक किंमत सर्वसामान्य नागरिकांनाच चुकवावी लागते. हजारो निष्पाप लोक युद्धात आपले प्राण गमावतात, लाखो लोकांना आपली घरे सोडण्यास भाग पाडले जाते आणि भावी पिढ्यांना भीती, असुरक्षितता आणि मानसिक आघाताच्या वातावरणात जगण्यास भाग पाडले जाते.

युद्धाची आग अण्वस्त्रांपर्यंत पोहोचली, तर त्याचे दुष्परिणाम केवळ एका देशापुरते मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण मानवी संस्कृतीला त्याची किंमत चुकवावी लागते. इतिहास साक्षी आहे की युद्धांमुळे केवळ सीमा बदलतात, माणसाचे नशीब नाही. तलवारी, क्षेपणास्त्रे आणि बॉम्ब कधीही शाश्वत शांतता प्रस्थापित करू शकत नाहीत; ते फक्त भीती, द्वेष आणि विनाश यांना जन्म देतात. राष्ट्रांनी शस्त्रास्त्रांच्या शर्यतीत उतरण्याऐवजी संवाद, मुत्सद्देगिरी आणि सहकार्याचा मार्ग स्वीकारण्याची आज गरज आहे.

जर मानवतेने इतिहासातून धडा घेतला नाही तर भविष्यात आपल्याला पुन्हा अशा शोकांतिकेला सामोरे जावे लागेल, ज्याची पुनर्प्राप्ती शतकानुशतके शक्य होणार नाही. युद्ध हे सामान्यतः विनाश, मानवी दुःख आणि आर्थिक नुकसानीचे प्रतीक मानले जाते आणि शांतता, संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे विवाद सोडविण्यावर भर दिला जातो, परंतु काहीवेळा शांतता प्रस्थापित करण्यासाठी युद्धे केली जातात. इतिहास अशा अनेक उदाहरणांनी भरलेला आहे जेव्हा युद्ध अपरिहार्य मानले जात होते.

असं असलं तरी, जेव्हा एखाद्या देशाच्या सार्वभौमत्वाला, स्वातंत्र्याला, सुरक्षेला किंवा मानवी मूल्यांना गंभीर धोका निर्माण होतो आणि सर्व शांततापूर्ण प्रयत्न अयशस्वी होतात, तेव्हा युद्ध हाच एकमेव उपाय उरतो. कधी कधी स्वसंरक्षणासाठीही युद्ध आवश्यक होते. खुद्द यूएन सनदच याचे समर्थन करते. जर एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या देशावर हल्ला केला, तर पीडित देशाला आपल्या सीमा आणि नागरिकांचे रक्षण करण्यासाठी युद्धात जाण्याशिवाय पर्याय नसतो.

उदाहरणार्थ, दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीच्या विस्तारवादी मोहिमेमुळे अनेक देशांचे स्वातंत्र्य धोक्यात आले. जर मित्र राष्ट्रांनी जर्मनीविरुद्धच्या युद्धात प्रवेश केला नसता तर युरोपमधील लोकशाही आणि मानवी हक्कांना गंभीर धोका निर्माण झाला असता. अत्याचार आणि अन्याय संपवण्यासाठी काही सशस्त्र संघर्षही आवश्यक ठरले आहेत.

१९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध हे त्याचे महत्त्वाचे उदाहरण आहे. तत्कालीन पूर्व पाकिस्तानात (आताचा बांगलादेश) मोठ्या प्रमाणावर मानवी हक्कांचे उल्लंघन आणि राजकीय दडपशाही होत होती. लाखो निर्वासित भारतात आले, ज्यामुळे मानवतावादी आणि सुरक्षा संकट निर्माण झाले. त्यामुळे बांगलादेशची निर्मिती होऊन युद्ध झाले. म्हणूनच अनेक इतिहासकार या युद्धाकडे न्याय आणि स्वयंनिर्णयाच्या हक्काची स्थापना म्हणून पाहतात. कधीकधी युद्धामुळे दीर्घकाळ शांततेचा मार्गही मोकळा होतो. उदाहरणार्थ, संयुक्त राष्ट्रांची स्थापना, वसाहतवादाचा जलद अंत आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या नवीन संस्थांचा विकास हे दुसऱ्या महायुद्धानंतरच घडले. हे खरे आहे की आधुनिक शस्त्रांच्या, विशेषतः अण्वस्त्रांच्या युगात, युद्धाचे दुष्परिणाम संपूर्ण मानवतेवर होऊ शकतात. विशेषतः इराक युद्ध आणि अफगाणिस्तान संघर्षाने हे दाखवून दिले आहे की संघर्षाच्या नावाखाली घेतलेले सर्व निर्णय योग्य किंवा यशस्वी होत नाहीत, परंतु जेव्हा युद्धाचा उद्देश संरक्षण, न्याय आणि शांतता प्रस्थापित करणे आणि सर्व राजनैतिक उपाय अपयशी ठरतात तेव्हा त्याची अपरिहार्यता वाढते. याचा अर्थ असा की काही विशिष्ट परिस्थिती आहेत ज्यात देशांना युद्धभूमीत प्रवेश करणे अनिवार्य होते.

आजची युद्धे केवळ आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठीची असल्याचे अनेकदा समोर आले आहे. काही दिवसांपूर्वी महासत्ता असणाऱ्या अमेरिकेला इस्राईल इराण सारख्या छोट्या देशांनी यूथाचे आव्हान दिले नुसते आव्हान दिले नाही तर अमेरिकेला नामोहरम करून सोडले. अनेकदा केवळ चर्चांच्या गुऱ्हाळात दोन देशाचे विचारवंत एकत्र येऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न झळा. या प्रयत्नात दडपली जाते ती त्या त्या देशातील सर्वसामान्य जनता. आपल्या भारताने जेव्हा जेव्हा युद्ध केले त्या प्रत्येक वेळी दुश्मन सैन्याचा पहिला हल्ला झाल्यानंतर प्रत्युत्तर केले आहे. संपूर्ण जगाला भारताचे अस्तित्व सिद्ध करण्याची वेळ आली तेव्हा पोखरांमधून अणुबॉम्बची चाचणी यशस्वीरीत्या पार पडली. त्यावेळी बुद्ध हसला असेच उद्‌गार देशाच्या नागरिकांच्या ओठी आले होते.

**लोकसंसद**

## अलिकडे देशात अल्पावधीत अनेक पूल कोसळण्याच्या घटना

गेले आठवडाभर गडचिरोली भागात मुसळधार पाऊसाचा वर्षाव होत आहे. गडचिरोली येथे कोठी कोरणार पुलाला याचा मोठा धक्का बसला. या पुलाचा मोठा भाग पुराच्या पाण्यात खचून वाहून गेला त्यामुळे या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली. पुलाचे आयुष्य अवघे तीन वर्षाचे होते. महाराष्ट्र व छत्तीस गड या दोन राज्याला जोडणारा हा पूल होता व त्याचे उद्‌घाटन १५ ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले होते. विशेष म्हणजे १५ पैकी पाच पिलर कोसळले या पुलाचा खर्च चार कोटी रुपये आल्याचे कळते. बिहार राज्यात तर पूल कोसळण्याच्या अनेक घटना आहेत. सन २०२१ ते २०२५ या पाच वर्षाच्या काळात बिहार राज्यात तब्बल २६ पूल कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत यामुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. बांधकामातील हलगर्जीपणा यासाठी कारणीभूत आहे. पूर्वीच्या काळातील बांधकामाचा दर्जा वाखाणण्यासारखा होता. महाराष्ट्रात तर गेली सुमारे शंभर वर्षाचे अनेक पूल दिमाखात उभे आहेत. सांगली येथे कृष्ण नदीवर असलेला पूल शंभर वर्षे होऊनही आज चांगल्या स्थितीत आहे हा दर्जा अलिकडच्या पुलाला का प्राप्त होत नाही? हा खरा प्रश्न आहे कृष्णां नदीला दरवर्षी मोठा पूर येतो अशा पुराशी सामना देत हा पूल उभा आहे मग अलिकडचेच पूल लवकर का पडतायेत? पुलासाठी वापरलेले सिमेंट, त्याचे बांधकाम याचे व्यवस्थित ऑडिट झाल्याशिवाय तो पूल वापरासाठी खुला करू नये संबंधितविभागाच्याअधिकाऱ्यांना याबाबतीत जबाबदार धरावे तरच अशा घटना पुनः होणार नाहीत .

**शांताराम वाघ पुणे**

**दिनविशेष**

# दोन राष्ट्रगीतांचे जनक ; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर



आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्दल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने ''सर'' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

**श्याम बसप्पा ठाणेदार**

# सेंद्रिय शेती काळाची गरज

## • कृषी अधीक्षक वंदना शिंदेंचे प्रतिपादन •शेतकऱ्यांना गोकृपामृत, दशपर्णी अर्क निर्मितीचे प्रात्यक्षिक



**। चौल । प्रतिनिधी ।**

रासायनिक शेतीमुळे वाढणारा उत्पादन खर्च, घटणारी जमिनीची सुपीकता आणि पर्यावरणावरील दुष्परिणाम लक्षात घेता सेंद्रिय शेती ही काळाची गरज असून, शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग, अलिबाग यांच्या वतीने चौल येथील पाझर पाटीलवाडा येथे डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत सेंद्रिय शेती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात वंदना शिंदे यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

प्रारंभी कार्यशाळेत नागाव विभागाचे मंडळ कृषी अधिकारी मोहन सूर्यवंशी यांनी गोकृपामृत आणि दशपर्णी अर्क तयार करण्याचे सविस्तर प्रात्यक्षिक सादर केले. नैसर्गिक शेतीतील या निविष्ठांचा वापर करून रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले.

यावेळी श्री शिवकल्याण शेतकरी गट, चौल येथील सदस्यांसह उपस्थित शेतकऱ्यांना गोकृपामृत तयार करण्यासाठी लागणाऱ्या निविष्ठांचे वाटप करण्यात आले. तब्बल दहा हजार लीटर गोकृपामृत तयार करण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. सदरचे साहित्य जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांच्या हस्ते ५० शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले. यामध्ये गोकृपामृत बनविण्यासाठी २०० लीटरचा प्लॅस्टिक पिंप, दोन किलो काळा सेंद्रिय गुळ, एक लीटर कल्चर, दोन लीटर देशी गायीचे ताक हे साहित्य वाटप करण्यात आले.

दरम्यान, कृषक कल्याणकारी संस्था (चौल)चे संस्थापक अध्यक्ष रवींद्र गजानन पाटील यांनी मार्गदर्शन करताना रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अतिरेक झाल्यामुळेजमिनीचापोतखालावला असून, पर्यावरणाचे संतुलनही बिघडत असल्याचे सांगितले. उत्पादनवाढीसाठी मधमाशी पालनाचे महत्त्व अधोरेखित करत पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना हळद व सुरण लागवडीसाठी आवश्यक कंद कृषी विभागामार्फत उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

या कार्यक्रमासाठी तालुका कृषी अधिकारी तन्मय भगत, नागावचे मंडळ कृषी अधिकारी मोहन सूर्यवंशी, पोयनाडचे मंडळ अधिकारी हिंदूराव मोरे, चौलच्या उपकृषी अधिकारी कविता जामदार, चौलचे कृषीसेवक प्रशांत मुंडे, थळचे कृषीसेवक संतोष टकले आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक थळकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन रवींद्र पाटील यांनी केले.

### असे तयार करा दशपर्णी अर्क

कडुलिंबाचा पाला ५ किलो, पपई, पेरू, रूई, शेवगा, करंज, आघाडा, कवठ, तुळस, सीताफळ, गुळवेल, निरगुंडी, एरंड, धोत्रा, टणटणी, मिरचीचा ठेचा २ किलो, लसूण पेस्ट २५० ग्रॅम, शेण ५ किलो, गोमूत्र ५ लीटर. वरील सर्व घटक एकत्र करून आंबविल्यानंतर तयार होणारा दशपर्णी अर्क हा नैसर्गिक कीडनाशक म्हणून प्रभावी ठरतो.

### असे तयार करा गोकृपामृत

२०० लीटर पाणी, २ किलो काळा गूळ, २ लीटर ताक, आवश्यक प्रमाणात गोकृपामृत कल्चर. सर्व घटक एकत्र मिसळून योग्य पद्धतीने आंबविल्यानंतर गोकृपामृत तयार होते. हे नैसर्गिक खत जमिनीची सुपीकता वाढविण्यास आणि पिकांची वाढ सुधारण्यास उपयुक्त ठरते.

## हुक्का पार्लरवर छापा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पनवेलच्या पथकाने तळोजा एमआयडीसी परिसरातील हॉटेल बाबाज किचनवर छापा मारून येथे अवैधरीत्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी हुक्का पात्रांसह विविध फ्लेवर्स आणि रोख रक्कम जप्त करून हुक्का पार्लर चालवणाऱ्या तीनजणांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले.

हॉटेल बाबाज किचन येथे अवैधरीत्या हुक्का पार्लर चालवून ग्राहकांना हुक्का पिण्यासाठी उपलब्ध करून देत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे व.पो.नि. प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो. नि. सागर निकम, अर्चना चिवटे, अनिल पाटील यांच्या पथकाने या हॉटेलवर छापा मारला. यावेळी या हॉटेलमध्ये काही व्यक्ती हुक्क्याचे सेवन करताना तसेच वेटर त्यांना हुक्क्याचे साहित्य पुरवताना आढळले. त्यानंतर गुन्हे शाखेने या हॉटेलमध्ये अवैधरीत्या हुक्का पार्लर चालवणाऱ्या विशाल विनोद यादव (२४), सागर सिद्धार्थ तांबे (४०) आणि फिरोज सुग्रंती अन्सारी (१९) या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

पोलिसांनी या हॉटेलमधून मोठ्या प्रमाणावर अवैध हुक्का साहित्यासह रोख रक्कम जप्त केल्याचे पोलिसांनी सांगितले. याबाबतचा अधिक तपास तळोजा पोलीस करीत आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे अंत्राट तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक हुकूमचंद लक्ष्मणप्रसाद गुप्ता यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २३ | १२ | १-५८-०० | ०-६५ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०७/०८/२०२६

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३




## श्रीवर्धन येथे सिमेंट मिक्सर उलटला

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन म्हसळा मार्गावरील बोडणीची डाग येथील तीव्र उतारावर एका बाराचाकी सिमेंट मिक्सरच्या अपघाताची घटना गुरुवारी सकाळी साडे सहा वाजता घडली आहे.

नवी मुंबईहून श्रीवर्धनच्या दिशेने येणाऱ्या या सिमेंट मिक्सरचे (एमएच ४३ बीजी ९६४०) बोडणीच्या घाटात ब्रेक निकामी झाले.त्यामुळे चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि भरधाव सिमेंट मिक्सर रस्ता सोडून कच्च्या रस्त्यावर जाऊन पलटी झाला.सुदैवाने या भीषण अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघातात चालक किरकोळ जखमी झाला असून, स्थानिक नागरिकांनी त्याला तात्काळ उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे.

## लाचलुचपतविरोधी जनजागृती मोहीम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (अँटी करप्शन ब्युरो), नवी मुंबई यांच्या वतीने नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराविरोधात जनजागृती करण्यासाठी ''लाचमुक्त नवी मुंबई-आपले शहर, आपली जबाबदारी'' ही मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर पैशांची मागणी झाल्यास किंवा लाच स्वीकारली जात असल्यास नागरिकांनी तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यासाठी विभागाने १०६४ हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित केला असून, हेल्पलाईन, दूरध्वनी, ई-मेल आणि संकेतस्थळाच्या माध्यमातूनही तक्रारी नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तक्रारदाराची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, अशी ग्वाहीही विभागाने दिली आहे.

अँटी करप्शन ब्युरो, नवी मुंबईचे पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी नागरिकांनी निर्भयपणे पुढे येऊन भ्रष्टाचाराविरोधात सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. तसेच ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे म्हटले आहे.


### कंत्राटी तत्वावर 'वाहन चालक' पदाकरिता जाहिरात :-

रायगड-जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग या कार्यालयासाठी कंत्राटी तत्त्वावर खालील अटी व शर्तीवर वाहन चालक पद (१) तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने करिता भरावयाचे आहे. सदर पदाकरीता महाराष्ट्र शासनाने विहीत केलेल्या प्रचलित नियमांनुसार किमान वेतन अनुज्ञेय राहील. त्यासाठी इच्छुक उमेदवारांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग या कार्यालयात दिनांक १३/०८/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजे पर्यंत प्रत्यक्ष हजर राहून अर्ज दाखल करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अर्ज करण्याबाबतचा अर्जाचा नमुना, शैक्षणिक पात्रता, अटी, नियम सूचना जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांचे अधिकृत संकेतस्थळावर https://raigad.docourts.gov.in/ प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग व सर्व तालुका विधी सेवा समिती यांच्या सूचना फलकावर लावण्यात आलेल्या आहेत.

दिनांक :- ०६/०८/२०२६

सही/-
सचिव,
**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,**
**रायगड-अलिबाग**

### अलिबाग नगरपरिषद
### सूचना

अलिबाग नगरपरिषदेचे सन २०२५-२६ या वर्षाचे वार्षिक लेखे मंजूर झाले असून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०३ अन्वये नगरपरिषदेच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करणेत आले आहेत.

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या द्वारे कळविण्यात येते की, माझे आशिल मौजे उसर ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायम रहिवासी आहेत. खालील नमुद मिळकत, सदर मिळकतीचे मालक श्री. शांताराम लक्ष्मण शिंदे हे आहेत.

संदर्भित जमीन मिळकत ही भोगवटा वर्ग २ मध्ये नमुद होत आहे. त्याच प्रमाणे या मिळकतीचे एकमेव मालक शांताराम लक्ष्मण शिंदे हेच आहेत. त्याच्या व्यतिरिक्त या मिळकतीचे खरेदीखत गहाण किंवा या मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा अधिकार इतर कोणासही नाही. मात्र त्यांचा मुलगा अजय शांताराम शिंदे हा सदर मिळकतीची विक्री करण्यासाठी खोटा दस्त किंवा खरेदीखत करण्याच्या हेतुने शांताराम शिंदे यांना घेऊन दमदाटी करून खरेदीखत करणार आहे. असे समजले आहे. त्यामूळे खाली नमुद केलेल्या मिळकती संदर्भात कोणत्याही प्रकारचा दस्त करून घेऊ नये त्याचप्रमाणे यापुर्वी जर असे काही दस्त खरेदीखत साठेकरारा संमतीपत्र नोटरी करून घेतले असल्यास ते चुकीचे व कायदेशीर नाहीत.

त्यामुळे खाली नमुद केलेल्या मिळकती संदर्भात कोणत्याही प्रकाराचे दस्त करून नयेत मात्र सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर केलेले दस्त किंवा कोणत्याही प्रकारचे विक्री व्यवहार हे कायदेशीर नसल्यामुळे त्याची संपुर्ण जबाबदारी करून घेणार त्याच्यावर राहील त्याबाबत मालक शांताराम लक्ष्मण शिंदे हे जबाबदार राहणार नाहीत त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार |
|---|---|---|---|
| उसर | २०/१/ब | ०.२०.०० | ५.१६ |
| उसर | २८/२ | ०.३४.६० | ६.१९ |

अलिबाग
दि.०६/०८/२०२६

सही/-
**ॲड. सचिन एकनाथ नाईक**
बी.ए.एल.एल.बी
एम.एच.ए.२६७/२०२०
ऑफिस, अलिबाग कोर्ट, नवीन वकील बार रूम, नवीन बिल्डींग
जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड

### जाहीर नोटीस

अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात

शिशिर शशिकांत संसारे, ... अपिलार्थी
विरूद्ध
मनोज चंद्रकांत संसारे, ... उत्तरार्थी

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसीत वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात विलंब माफी अर्ज क्र. ८१/२०२५ दाखल केले आहे.

| गावाचे नांव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे सासवणे, | ४६४/१ | १-८५-०० | १०.४९ |
| ता. अलिबाग | ४६४/२ | ०-२१-०० | १.१९ |

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थींना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

उत्तरार्थीचे नाव :
८. श्रीम. विनिता विलास संसारे
रा. मु. पो. सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड ... उत्तरार्थी
१२. श्रीम. सरिता सुहास संसासे
द्वारा विनिता विलास संसारे
१३. सौ. संगिता राज दातार
माहेरचे नाव संगिता सुहास संसारे
१४. सौ. सुप्रिया प्रफुल्ल घुणे
(माहेरचे नाव सुप्रिया सुहास संसारे )
द्वारा विनिता विलास संसारे
१५. श्री. प्रशांत प्रमोद संसारे
द्वारा विनिता विलास संसारे
क्र. १२ ते १५ रा. मु. पो. सासवणे,
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि. १०.०८.२०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

**(मुकेश चव्हाण)**
उपविभागीय अधिकारी अलिबाग
उपविभाग अलिबाग


## पान ३ वरून

## डॉक्टरांच्या आंदोलनाला तीव्र वळण

शिक्षणाच्या गुणवत्तेवर आणि राज्यातील आरोग्य व्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासावर होऊ शकतो, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यामुळे आयएमए महाराष्ट्रने सुरू केलेल्या नियमित व गैर-आपत्कालीन वैद्यकीय सेवा बंद आंदोलनाला MARD, ASM आणि सर्व स्पेशालिस्ट संघटनांनी पाठिंबा दिला असल्याची माहिती डॉ. विनायक पाटील यांनी दिली. संयुक्त निवेदनात शासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, प्रलंबित मागण्यांवर तातडीने समाधानकारक निर्णय न झाल्यास आपत्कालीन वैद्यकीय सेवांसह बेमुदत सेवा बंद आंदोलन करण्यात येईल. तसेच BHMS-CCMP नोंदणी प्रक्रिया तात्काळ स्थगित करून सर्व संबंधित प्रश्नांवर तोडगा काढावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

यावेळी डॉ. समीर नाईक, डॉ. राहुल म्हात्रे, डॉ. राजेंद्र चांदोरकर, डॉ. सचिन जायभाय, डॉ. सौरभ पाटील, डॉ. सागर खेडू, डॉ. वाजे, डॉ. पूनम नाईक, डॉ. रेश्मा चेऊलकर, डॉ. शिंदे, डॉ. वैभव चेऊलकर आणि डॉ. अमृत माने उपस्थित होते.

## आरोग्यसेवा कोलमडली

सिटीस्कॅन, डायलेसिस, ऑक्सिजनसह आधुनिक सुविधा उपलब्ध असल्या, तरी तज्ज्ञ डॉक्टरांच्या अभावामुळे त्या सुविधांचा पूर्ण क्षमतेने वापर होत नसल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत. ऑन-कॉल आणि अर्धवेळ डॉक्टरांची व्यवस्था असली तरी गरजेच्या वेळी ते वेळेत उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारीही सातत्याने पुढे येत आहेत.

मुंबई-गोवा महामार्गावरील वाढते अपघात, दक्षिण रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता माणगाव उपजिल्हा रुग्णालयाला सक्षम करणे आवश्यक आहे. मात्र वर्षानुवर्षे रिक्त पदे न भरल्याने आरोग्य विभाग आणि लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

रुग्णालयात जनरल सर्जन, स्त्रीरोगतज्ज्ञ, फिजिशियन, भूलतज्ज्ञ आणि इतर तज्ज्ञ डॉक्टरांची तातडीने कायमस्वरूपी नियुक्ती करून सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## मोटारसायकलस्वार ठार

हॉटेल समोर आल्यानंतर रस्त्याच्या वळणावर रस्त्याच्या धोकादायक परिस्थितीकडे दुर्लक्ष करून मोटर सायकल भरधाव वेगाने चालवून रस्त्यालगतच्या रेलिंगला ठोकर दिली. या अपघातामध्ये मोटार सायकलस्वार तरूण गंभीर जखमी झाल्याने उपचारासाठी ॲम्ब्युलन्सने ग्रामीण रुग्णालय महाड येथे दाखल केले. यावेळी राज विनोद मोरे या मोटारसायकलस्वाराला डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले.

महामार्गावरील अपघात ग्रस्त वाहन बाजुला करुन वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. पोलादपूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

## तळा शहरातील डम्पिंग ग्राऊंड धोकादायक

कचऱ्यावर पाणी पडून त्यातून निर्माण होणारे दूषित द्रव जमिनीत मुरण्याची शक्यता आहे. त्यामुळे भूजल दूषित होण्याचा धोका निर्माण झाला असून, नागरिकांच्या आरोग्याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, याच रस्त्यावर पुढे तहसील कार्यालय असल्याने तालुक्यातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. दुर्गंधीमुळे या मार्गावरून ये-जा करताना नागरिकांना अक्षरशः नाक मुठीत धरून जावे लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

**घनकचरा व्यवस्थापन नियमांकडे दुर्लक्ष?**

स्वच्छ भारत अभियान तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार जुन्या कचरा साठवणूक स्थळाचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. मात्र, तळा शहरातील जुन्या डम्पिंग ग्राऊंडची स्थिती पाहता या नियमांच्या अंमलबजावणीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने जुना कचरा तातडीने हटवून बायोमायनिंग किंवा शास्त्रोक्त कचरा प्रक्रियेच्या माध्यमातून डम्पिंग ग्राऊंड स्वच्छ करावे, अशी मागणी तळा शहरवासीयांकडून होत आहे.

## पळसदरीजवळ भीषण अपघात

पळसदरी येथील अरुंद रस्त्यावर समोरून येणाऱ्या वॅगनार कारची पोशिर येथील रोहित वाघमारे यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. या अपघातात दुचाकीवरील अंबरनाथ येथील सोनाली हिचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या रोहित वाघमारे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच श्री स्वामी समर्थ मठाची रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने कर्जत उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, कर्जत-खोपोली मार्गावरील अनेक ठिकाणी रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण असून काही ठिकाणी रस्त्याची रुंदी अचानक कमी होते. तसेच आवश्यक इशारा फलक, सुरक्षा बॅरिकेड्स आणि रस्ते चिन्हांचा अभाव असल्याने या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दहा वर्षांपासून भूसंपादनाचा मोबदला न मिळाल्याने रस्त्याचे काम रखडले आहे. सध्या भूसंपादन विभागाकडून हालचाली सुरू असल्या, तरी अद्याप मोबदल्याचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. परिणामी हा मार्ग अपघातप्रवण ठरत असून आतापर्यंत अनेकांना जीव गमवावा लागला आहे. पळसदरीचा हा अपूर्ण रस्ता आणखी किती बळी घेणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. याप्रकरणी कर्जत पोलिसांनी गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## एमडी ड्रग्जसह दोन तस्कर जेरबंद

**पनवेल** :खारघर पोलिसांनी अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या मोहम्मद अथर हुसॅन शमशाद हुसॅन अंसारी (२८) आणि अलत्मीम अवैश सिद्दीकी (२०) या सराईत तस्करांना अटक केली आहे. पोलिसांनी या आरोपींकडून तब्बल १४.११ ग्रॅम वजनाचे मेफेड्रोन (एमडी) तसेच मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि रोकड असा एकूण ४.३३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. खारघर पोलिसांचे पथक सेक्टर-३५ एफ भागात गस्त घालत असताना साई सिम्फनी सोसायटीसमोर मोहम्मद हुसॅन आणि अलत्मीम सिद्दीकी संशयास्पदरित्या आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेतली असता, हुसॅन अन्सारी याच्याजवळ

७० हजार किंमतीचे १४.११ ग्रॅम एमडी पावडर, मोबाईल फोन, मोटारसायकल व रोकड सापडली. तर अलत्मीम अवैश सिद्दीकी याच्याजवळ ४४ हजार रुपये किमतीचे मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि नोटा मोजण्याचे मशिन सापडले. त्यानंतर पोलिसांनी अलत्मीम अवैश सिद्दीकी याच्या साई सिम्फनी इमारतीतील २१०८ या फ्लॅटची झडती घेतली असता, तेथे एमडी आणि मोठ्या प्रमाणात रोख रक्कम सापडली.

## रक्षाबंधनावर महागाईचा फटका

दरम्यान, परदेशात तसेच इतर शहरांत नोकरी-व्यवसायासाठी असलेल्या भावांना बहिणींकडून टपालाद्वारे राख्या पाठविण्याची लगबगही सुरू झाली आहे. तसेच देशाच्या सीमेवर तैनात असलेल्या जवानांनाही मोठ्या प्रमाणावर राख्या पाठविण्याची तयारी सुरू आहे.


### जाहीर नोटीस

अर्जदारांतर्फे वकील वैशाली बंगेरा
दिवाणी चौकशी अर्ज क्र. १०४/२०२६

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

१. श्रीमती. शिल्पा कमलाकर साळवी,
२. श्री. निनाद कमलाकर साळवी
३. श्रीमती. धनश्री कमलाकर साळवी अर्जदार
नं. १ ते ३, रा. रजनी नारायण को ए/२, कॉलेज रोड
एस.बी.आय. बँक जवळ,
ता. अलिबाग, जि. रायगड.
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, कै. कमलाकर सदानंद साळवी, यांचे दि. १५/१२/२०२० रोजी जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे निधन झाले आहे. त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हे कै. कमलाकर सदानंद साळवी यांचे कायदेशीर वारसदार आहेत. कै. कमलाकर सदानंद साळवी यांचे खुद्द मालकीची खुद्द ताबेकब्जा वहिवाटीतील मौजे अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीतील सिटी, सर्व्हे नं. १००१/१अे, १००१/१ बी २, १००१/१- बी १-बी, के १००१/१ मधील नियोजित इमारतीतील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २ क्षेत्र ५२५ चौ.फुट बिल्टअप (४८.७९ चौ.मी.) हि मिळकत दि. २५/११/१९९८ रोजी खरेदी केलेली मिळकत आहे. सदर मिळकतीचा अलिबाग नगरपरिषदेमधील असेसमेंट उतारी सदनिका क्र. १०२, मालमत्ता क्र. ALB००००१७४२ जुना मालमत्ता क्र.ZMKT१००१७४४ मॅन्युअल मालमत्ता क्र. १४७७ B-WING असा असून त्याचे क्षेत्रफळ ३४.७६ असे आहे. या स्थावर मिळकतीचे त्यांचे मृत्युपश्चात कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. याकरीता दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला मिळणे आवश्यक आहे.

सबब अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांची ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह सदर चौकशी अर्जाचे नेमलेली तारीख ३१/८/२०२६ अशी आहे. सदर नेमलेल्या तारखेस मा. न्यायालयात लेखी स्वरुपात हरकत द्यावी. नेमलेल्या तारखेस तशी हरकत न आल्यास हे मा. न्यायालय उपलब्ध पुराव्याचे आधारे पुढील कायदेशीर कारवाई करील व अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणतीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. आज दि. ६/८/२०२६ रोजी आमच्या सही शिक्यानिशी दिली.

व. लिपिक
दिवाणी न्यायालय व. स्तर अलिबाग

(शिक्का)

अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर
अलिबाग-रायगड

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री केतन बाळु गावडे रा कडाव ता.कर्जत जि रायगड महाराष्ट्र ४१०२०१ खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री गणपत सदु राजगुरु व इतर १६ रा. वडवली यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे चांधई, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ७९/४/अ एकुण ०.२६.०० गुंठे तसेच सर्व्हे नं ७९/५ एकुण ०.१७.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०७/०८/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

# माणगाव-इंदापूर बायपास अडचणीत!

## रेल्वे मेगा ब्लॉकशिवाय ओव्हरब्रिजचे काम अशक्य; गणेशोत्सवापूर्वी बायपास सुरू होण्याच्या आशा धुळीस

सलीम शेख

| माणगाव |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील बहुप्रतीक्षित माणगाव आणि इंदापूर बायपास अंतिम टप्प्यात पोहोचला असला, तरी रेल्वे प्रशासनाच्या दिरंगाईमुळे संपूर्ण प्रकल्प पुन्हा रखडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. बायपासची एकेरी मार्गिका जवळपास पूर्ण झाली असून अनेक ठिकाणी अंतिम कामे सुरू आहेत. मात्र, रेल्वे मार्गावरील ओव्हरहेड पुलाचे काम अद्याप सुरू होऊ न शकल्याने बायपास वाहतुकीसाठी खुला करणे अशक्य ठरत आहे.



या पुलाच्या उभारणीसाठी कोकण रेल्वे मार्गावर किमान एक दिवसाचा मेगा ब्लॉक आवश्यक आहे. मात्र, दररोज धावणाऱ्या शेकडो एक्सप्रेस आणि मालगाड्यांमुळे हा ब्लॉक मंजूर करणे रेल्वे प्रशासनासमोर मोठे आव्हान बनले आहे. परिणामी पुलाचे काम सुरू होऊ शकलेले नाही.

याहून गंभीर बाब म्हणजे, वारंवार पाठपुरावा करूनही रेल्वे प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अद्याप प्रत्यक्ष स्थळाची पाहणीही केलेली नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक, व्यापारी, वाहनचालक आणि लोकप्रतिनिधींमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.

### 'रेल्वे प्रशासन रुळावर आल्याशिवाय बायपासवर वाहने धावणार नाहीत'

माणगाव-इंदापूर बायपासचे भवितव्य आता पूर्णपणे रेल्वे प्रशासनाच्या निर्णयावर अवलंबून आहे. मेगा ब्लॉकला मंजुरी मिळाली तरच पुलाचे काम पूर्ण होईल आणि त्यानंतरच बायपास वाहतुकीसाठी खुला होईल. अन्यथा दरवर्षीप्रमाणे यंदाही आश्वासने महामार्गावरील खड्ड्यांमध्येच गडप होतील, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

गणेशोत्सवापूर्वी बायपास वाहतुकीसाठी खुला करण्याची आश्वासने सातत्याने दिली जात होती. मात्र सध्याची परिस्थिती पाहता यंदाच्या गणेशोत्सवालाही बायपास सुरू होण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचे चित्र आहे.

याचा सर्वाधिक फटका कोकणात जाणाऱ्या लाखो गणेशभक्तांना बसणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही माणगाव शहरातील वाहतूक कोंडी, पावसामुळे निर्माण होणारी चिखलमय परिस्थिती, महामार्गावरील मोठमोठे खड्डे आणि तासन्तास वाहनांच्या रांगा यांचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. यंदाही गणपती बाप्पाला खड्ड्यांतूनच प्रवास करावा लागणार का? असा सवाल नागरिक विचारत आहेत.

महामार्गावरील इतर बहुतांश कामे पूर्णत्वाकडे गेली असताना केवळ रेल्वे पुलाच्या रखडलेल्या कामामुळे कोट्यवधी रुपयांचा बायपास वापराविना पडून राहणार आहे. त्यामुळे विकासाच्या गप्पा आणि प्रत्यक्षातील वास्तव यात मोठी दरी असल्याचे दिसून येत आहे. नागरिकांची आता एकच मागणी आहे. रेल्वे प्रशासनाने तातडीने मेगा ब्लॉक मंजूर करून ओव्हरहेड पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे. अन्यथा मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि प्रवाशांचा त्रास यंदाही कायम राहील.

## ११ ऑगस्ट रोजी पेन्शन अदालत

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

कोकण विभागीय पेन्शन अदालत मंगळवारी (दि. ११) दुपारी १२.०० वाजता कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन येथे आयोजित केली आहे. या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित रहावे.

## गणेशोत्सवापूर्वी अखंडित वीजसेवा द्या

### तळेवासियांचा महावितरणला इशारा



| तळा | प्रतिनिधी |

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तळा महावितरण आयोजित आढावा बैठकीत नागरिक, उद्योजक, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत गणेशोत्सवापूर्वी अखंडित वीजपुरवठा देण्याची जोरदार मागणी केली.

वारंवार होणारी वीजखंडित, संथ दुरुस्ती आणि अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेवर उपस्थितांनी सडकून टीका केली.

बैठकीत तालुक्यातील सर्व १२ वाड्यांसाठी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर, मांदाड येथे नवीन सब-स्टेशन, साले इन्कमर तातडीने सुरू करणे, भुमिगत वीज वाहिनी योजने संबंधी पाठपुरावा करणे, वायरमन व अधिकाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्यास राहणे, रात्रीच्या सेवेसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करणे यांसह अनेक महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या.

यावेळी कार्यकारी अभियंता प्रदीप डालू यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना धारेवर धरत मुख्यालयी राहत नसलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला. नियमित आणि दर्जेदार वीजपुरवठा हीच नागरिकांची प्रमुख अपेक्षा आहे. त्यासाठीच शासनाने आपली नेमणूक केली आहे. कर्तव्यात कसूर करणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

## १५ वित्त आयोगाच्या निधीने ग्रामसभा गाजली



| नेरळ | प्रतिनिधी |

ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा १६ वित्त आयोगाचा आराखडा मंजुरी साठी होता.मात्र १५ वित्त आयोगामध्ये कोणती कामे केली याबाबत कोणतीही माहिती नेरळ ग्रामपंचायत कडून देण्यात आलेली नाही. त्यामुळे १५ वित्त आयोगाच्या निधी मधून करण्यात आलेल्या कामांची माहिती द्या आणि नंतरचा १६ वित्त आयोगाच्या आराखड्याला मंजुरी दिली जाईल असे ठोस भूमिका ग्रामस्थांनी घेतली.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीत १६ वित्त आयोगाच्या निधी मधून करण्यात येणाऱ्या कामांची यादी निश्चित करण्यासाठी ग्रामसभा लावण्यात आली होती. प्रशासक सुजित धनगर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेला सचिव ग्रामपंचायत अधिकारी अरुण कारले यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य सुनिता मोरे, पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे आदी प्रमुख तसेच स्थानिक ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. गावाच्या विकासासाठी शासनाकडून मिळणाऱ्या निधीरूपी १६ वित्त आयोगासाठी प्रारूप आराखडा सादर करण्याचे आदेश जिल्हापरिषद कडून देण्यात आले होते त्यामुळे नेरळ ग्रामपंचायत कडून जुलै महिन्यात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते मात्र कोरम अभावी तहकूब झालेल्या सभेचे आयोजन केले होते. नेरळ ग्रामपंचायत हद्दीत १६ वा वित्त आयोगात करण्यात येणारी कामे ही माहिती नेरळ ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी अरुण कारले यांनी वाचन केले. त्यावेळी आदिवासी भागासाठी कोणती कामे प्रस्तावित आहेत असा प्रश्न माजी सदस्य सुनील पारधी यांनी उपस्थित केला.१५ वित्त आयोगाच्या आराखड्यात कोणताही निधी देण्यात आला नव्हता आणि त्यामुळे १६ वित्त आयोगाचा निधी मिळावा अशी मागणी केली. तर माजी सदस्य संजय मनवे यांनी नेरळ ग्रामपंचायत चे थकीत वीज बिलासाठी १६ वित्त अयोगाचा निधी वापरण्यात यावा अशी मागणी केली. १५ वा वित्त आयोगाचे मागील कामाचे पैसे आज देखील काही ठेकेदारांना अदा करत आहेत,मात्र त्या ठेकेदारांनी कोणती कामे केली हे समोर आले पाहिजेत अशी मागणी कर्जत पंचायत समितीचे भगवान चंचे यांनी समोर आणली.तेव्हा कोणती कामे झाली,कोणती कामे बाकी आहेत हे नेरळ ग्रामस्थ यांना समजायला हवी अशी मागणी केली.शेवटी पंधरावा वित्त आयोगाची माहिती द्या मग पुढील आराखडा अंतिम करू अशी भूमिका नेरळ ग्रामस्थांनी घेतली.

## स्ट्रक्चरल ऑडिटची मुभा द्या

### सुरक्षिततेसाठी घरमालक संस्थांचा आग्रह

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

सिडकोने उभारलेल्या जुन्या व जीर्ण इमारतींचे स्वतंत्र स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची परवानगी संबंधित गृहनिर्माण संस्थां तसेच अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन यांना देण्यात यावी, अशी मागणी पनवेल महानगर अपार्टमेंट ओनर्स संस्था महासंघाने महापौर नितीन पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्यामुळे इमारतीच्या वास्तविक स्थितीचा निष्पक्ष अहवाल मिळेल आणि पुनर्विकासाच्या नावाखाली सक्षम इमारतींना धोकादायक घोषित करण्याच्या प्रकारांना आळा बसेल, असा दावा महासंघाने केला आहे.

महासंघाने निवेदनात म्हटले आहे की, सध्या अनेक ठिकाणी पालिका किंवा संबंधित यंत्रणांकडून नियुक्त करण्यात आलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटरच्या अहवालावरच पुढील निर्णय घेतले जातात. मात्र काही प्रकरणांत रहिवाशी संस्था मधील काही सभासधाना हाताशी धरून बिल्डर, संबंधित अधिकारी आणि ऑडिटर यांच्या संगनमतातून प्रत्यक्षात सुरक्षित असलेल्या इमारतीही धोकादायक ठरविल्या जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे अशा प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी घरमालकांच्या संस्थांनाच शासनमान्य स्वतंत्र तज्ज्ञ संस्थेकडून स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याचा अधिकार देणे आवश्यक असल्याचे महासंघाने म्हटले आहे.

महासंघाच्या मते, सिडकोच्या तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांनी ५ जुलै २०१३ रोजी दिलेल्या पत्रातही इमारतींची सखोल तांत्रिक तपासणी करूनच दुरुस्ती, पुनर्बांधणी अथवा पुनर्विकासाचा निर्णय घेण्याचा उल्लेख केला होता. इमारतीची वहनक्षमता, गंज, काँक्रीटची गुणवत्ता आणि इतर तांत्रिक बाबींची विविध चाचण्यांद्वारे तपासणी झाल्यानंतरच अंतिम निर्णय व्हावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रत्येक जुन्या इमारतीचा पुनर्विकास करणे आवश्यक नसते. अनेक इमारतींचे योग्य दुरुस्ती व मजबुतीकरण करून त्यांचे आयुष्य वाढविता येऊ शकते. त्यामुळे स्वतंत्र आणि निष्पक्ष स्ट्रक्चरल ऑडिटचा पर्याय उपलब्ध झाल्यास नागरिकांच्या हिताचे संरक्षण होईल आणि पुनर्विकास प्रक्रियेत पारदर्शकता वाढेल, असा विश्वास महासंघाने व्यक्त केला आहे.

याशिवाय बिल्डरची आर्थिक क्षमता, अनुभव, बँक गॅरंटी आणि प्रकल्प पूर्ण करण्याची क्षमता तपासूनच पुनर्विकासाचा निर्णय घ्यावा, तसेच प्रत्येक टप्प्यावर सभासदांचा सहभाग अनिवार्य ठेवावा, अशी मागणीही महासंघाने केली आहे.

## जनजागृती अभियानाचे आयोजन

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

श्री डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल येथील राष्ट्रीय सेवा योजना एनएसएस विभागाच्या वतीने २ ऑगस्ट रोजी नशामुक्त युवा विकसित भारत २.० या जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानात ५०० हून अधिक विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

अभियानांतर्गत व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ, जनजागृती रॅली, पोस्टर व घोषवाक्य स्पर्धा, पथनाट्य, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रश्नमंजुषा तसेच विद्यार्थी जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी से टू नो ड्रग्स, से येस टू लाईफ हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला आणि व्यसनमुक्त भारत, निरोगी भारत व विकसित भारत घडविण्यासाठी सक्रिय सहभागाची शपथ घेतली. हा उपक्रम प्राचार्य डॉ. आशिष जैन यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली तसेच आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष धनराज विसपुते आणि सचिव संगीता विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करण्याबाबत जागरूकता निर्माण झाली आणि विकसित भारत २०४७ च्या संकल्पनेला बळकटी मिळाली.

## रेवदंडा अर्बनची पोयनाड शाखा नव्या जागेत स्थलांतरित

### अध्यक्ष व संचालक मंडळाच्या उपस्थितीत उत्साहात नूतन कार्यालयाचे उद्घाटन

| रेवदंडा | प्रतिनिधी |

रेवदंडा को-ऑप. अर्बन बँकेची पोयनाड शाखा नव्या प्रशस्त जागेत स्थलांतरित करण्यात आली असून, नव्या कार्यालयाचा शुभारंभ बँकेचे अध्यक्ष व संचालक मंडळाच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



पोयनाड येथील हिरू दलाल नगर, हरिओम सोसायटी, गाळा क्र. २ येथे शाखेचे नूतन कार्यालय सुरू करण्यात आले. यानिमित्त आयोजित उद्घाटन समारंभात बँकेचे विद्यमान अध्यक्ष नजमूसाकिब म. अ. लांबाते यांच्या हस्ते फीत कापून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी संचालक वामन घरत, प्रभाकर धर्मा नाईक, महेंद्र वसंत पाटील, निलेश नारायण गाडे, सतीश नारायण लेले तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश हिराजी माळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पोयनाड शाखेच्या शाखाधिकारी अर्चना राजेश गायकवाड तसेच कर्मचारी मनीष राजेंद्र घाटकर, श्रेया रामचंद्र केसरकर आणि रूपेश नरेश चवरकर यांनी अध्यक्ष, संचालक व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्रसंगी पोयनाड परिसरातील अनेक मान्यवर, ग्राहक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे बँकेच्या अध्यक्ष व संचालक मंडळाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थितांनी नूतन शाखेला शुभेच्छा देत बँकेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

नवीन जागेत सुरू झालेल्या शाखेमुळे ग्राहकांना अधिक प्रशस्त, सुसज्ज व दर्जेदार बँकिंग सुविधा उपलब्ध होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### दिवसातून आठ-दहा वेळा वीज खंडित | महावितरणच्या कारभाराविरोधात नागरिकांचा संताप अनावर

## ऐन पावसाळ्यात निजामपूर अंधारात!

| माणगाव | प्रतिनिधी |

गेल्या अनेक महिन्यांपासून माणगाव तालुक्यातील निजामपूर शहर आणि परिसरात सुरू असलेल्या वारंवारच्या वीज खंडित होण्याच्या समस्येमुळे नागरिकांचा संताप आता टोकाला पोहोचला आहे. ऐन पावसाळ्यात दिवसातून तब्बल आठ ते दहा वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. घरगुती ग्राहक, व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी, लघुउद्योजक आणि नागरिकांना मनस्तापाला सामोरे जावे लागत असून, महावितरणच्या कथित निष्काळजी कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

निजामपूरपासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर कांदळगाव वीज उपकेंद्र असतानाही शहराला दर्जेदार आणि अखंडित वीजपुरवठा मिळत नसल्याबद्दल नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर परिस्थिती अधिकच गंभीर झाली असून, काही वेळा काही मिनिटांसाठी तर अनेकदा तासन्तास वीज गायब होत असल्याने जनजीवन ठप्प होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, वीजवाहिन्यांची नियमित देखभाल, झाडांच्या फांद्यांची छाटणी, तांत्रिक तपासणी आणि दोष दुरुस्ती वेळेवर होत नसल्यामुळे वारंवार ब्रेकडाऊन होत आहेत. संबंधित अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात उपलब्ध नसल्याने बिघाड दूर होण्यास विलंब होत असल्याचीही तक्रार आहे.

या सततच्या वीज लपंडावामुळे व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे निर्माण होत आहेत, कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे विद्युत उपकरणे धोक्यात येत आहेत, तर पाणीपुरवठा आणि इंटरनेट सेवाही विस्कळीत होत आहेत.

यापूर्वी ज्येष्ठ नागरिक संघटनेसह विविध सामाजिक संघटनांनी महावितरणकडे अनेक वेळा निवेदने देऊन या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र, महिना-दीड महिना उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. अधिकारी भेटण्यासाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या मारूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची खंत ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली आहे.

यामुळे आता नागरिकांचा संयम संपत चालला असून, महावितरण कार्यालयाला कुलूप ठोकून तीव्र आंदोलन छेडण्याची तयारी सुरू असल्याची माहिती मिळत आहे. येत्या काही दिवसांत वीजग्राहक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संपूर्ण माणगाव तालुक्यातच वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे माणगाव शहरात स्वतंत्र वीज उपकेंद्र तातडीने उभारण्यात यावे, अशी मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

**ठळक मुद्दे**

- दिवसातून ८ ते १० वेळा वीजपुरवठा खंडित.
- ऐन पावसाळ्यात नागरिकांचे जनजीवन विस्कळीत.
- व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्यांचे मोठे नुकसान.
- वारंवार निवेदने देऊनही ठोस उपाययोजना नाही.
- महावितरण कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा.
- माणगाव शहरात स्वतंत्र वीज उपकेंद्राची जोरदार मागणी.

# निवडक



## जुईनगर येथे वृक्षारोपण सोहळा

**नवीन पनवेल :** निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी, मभावना ग्रुपफच्या वतीने दरवर्षीप्रमाणे जुईनगर येथे अत्यंत उत्साहात वृक्षारोपण सोहळा संपन्न झाला. भावना ग्रुप नेहमीच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यात अग्रेसर असतो. हा संपूर्ण सोहळा संस्थापिका आणि मार्गदर्शिका अपर्णा राजेश शहा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, या पर्यावरणपूरक कार्यात प्रत्येकाला आपल्या कर्माचे फळ आणि पुण्यातील सहभाग लाभावा, यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या इच्छेनुसार सहभागी होण्याची संधी देण्यात आली. यावेळी उपक्रमाच्या उद्देशावर प्रकाश टाकताना आयोजकांनी सांगितले की, निसर्गाने आपणास जे भरभरून दिले आहे, त्याची परतफेड करणे आपल्या हातात नाही; परंतु नवीन वृक्षे लावून आणि त्यांचे संगोपन करून आपण निसर्गाचे आभार नक्कीच मानू शकतो. या हेतूने प्रेरित होऊन सर्व कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात रोपांची लागवड केली. निसर्गाचे आभार मानताना उपस्थितांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच व समाधानकारक नैसर्गिक आनंद झळकत होता. भावना ग्रुपचा हा स्तुत्य उपक्रम नागरिकांसाठीही कौतुकाचा विषय ठरला आहे.

## तटकरे महाविद्यालयाचे युवा महोत्सवात यश

**तळे :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा ने ५९ व्या युवा महोत्सवात यशस्वी सहभाग नोंदवला. मुंबई विद्यापीठ दक्षिण रायगड झोनचा ५९ वा युवा महोत्सव पी एन पी महाविद्यालय वेशवी अलिबाग येथे मंगळवार दिनांक ४ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता. या युवा महोत्सवामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. त्यात प्रामुख्याने नाटक, संगीत,साहित्य, नृत्य, पेंटिंग या कला प्रकारांमध्ये द.ग. तटकरे महाविद्यालय तळाने बारा स्पर्धा प्रकारांमध्ये सहभाग नोंदवला होता. त्यातील तीन स्पर्धा प्रकारात महाविद्यालयाला यश प्राप्त झाले

वक्तृत्व हिंदी या स्पर्धेत पांडुळे पंकज उत्तेजनार्थ, वक्तृत्व मराठी या स्पर्धेत पांडूळे पंकज तृतीय क्रमांक, वादविवाद मराठी या स्पर्धेत ध्रुव राऊत आणि पांडुळे पंकज यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मंगेश देशमुख, उपाध्यक्ष व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन पत्रकार पुरुषोत्तम मुळे, संस्थेचे सचिव महेंद्र कजबजे, संस्थेचे खजिनदार चंद्रकांत रोडे महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य, प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. भगवान लोखंडे, प्रा.भरत चाळके यांचे मार्गदर्शन लाभले.

## गणेशोत्सवाकरीता मोफत बससेवा

**महाड :** गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे आणि पुणे परिसरात वास्तव्यास असलेल्या महाड विधानसभा मतदारसंघातील चाकरमानी गणेशभक्तांसाठी यंदाही मोफत बससेवेचे आयोजन करण्यात आले आहे. शिरगावचे सरपंच तथा महाड विधानसभा उपजिल्हा समन्वयक (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) सोमनाथ दिगंबर ओझर्डे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम सलग पाचव्या वर्षी राबविण्यात येत आहे.यापूर्वी हा उपक्रम प्रामुख्याने विन्हेरे जिल्हा परिषद मतदारसंघापुरता मर्यादित होता. मात्र यंदा त्याचा विस्तार करून महाड, पोलादपूर आणि माणगाव या संपूर्ण महाड विधानसभा मतदारसंघातील चाकरमानी बांधवांना या मोफत बससेवेचा लाभ देण्यात येणार आहे.गणेशोत्सवासाठी गावी येणाऱ्या नागरिकांचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि सुलभ व्हावा, तसेच समाजसेवेच्या भावनेतून हा उपक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे सोमनाथ ओझर्डे यांनी सांगितले.या मोफत बससेवेचे संपर्क क्रमांक, मार्ग आणि वेळापत्रक ५ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली असून, महाड विधानसभा मतदारसंघातील चाकरमानी बांधवांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. तसेच या बससेवेचे बुकिंग ५ ऑगस्टपासून सुरू होणार आहे.



## विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

**मुरुड जंजिरा :** प्रत्येक समाजात गरीब,मध्यम वर्गीय व श्रीमंत असे घटक आहेत.शिक्षण घेण्यासाठी ही सर्व मुले शाळेत येत असतात.जे अत्यंत गरीब आहेत त्यांना शिक्षण घेणे सुद्धा कठीण होऊन बसत असते.अश्यावेळी सामाजिक दायित्व प्रत्येकाने स्वीकारल्यास गरीब घटकातील लोकांना वेळीच मदत मिळून ते सुद्धा विकासाच्या मुख्य प्रवाहात सामिल होऊ शकतात.यासाठी मदत व शैक्षणिक सहाय्य यासाठी प्रत्येक घटकातील व्यक्ती पुढे आल्यास गरीब घटकातील लोकांचा सुद्धा विकास होईल असे महत्वपूर्ण प्रतिपादन जिजाऊ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निलेश भगवान सांबरे यांनी केले आहे. पिटसई विभाग ज्ञान प्रसारक मंडळाचे अशोक ल .लोखंडे विद्यामंदिर, पिटसई येथील इयत्ता पाचवी ते दहावीतील मधील सुमारे ३०० विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून मोफत वह्या वाटप करण्यात आले. यावेळी असंख्य शालेय विद्यार्थी व पालक मोठी संख्येने उपस्थित होते. आपल्या मनोगतात जिजाऊ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे म्हणाले की ,राजकारणा पलीकडे जग आहे, ते जग आपण सगळ्यांनी स्वीकारले पाहिजे. त्यामध्ये प्रत्येकाने काम केले पाहिजे असे माझे शंभर टक्के मत आहे. राजकारणाचा उपयोग समाजाच्या हितासाठी झाला पाहिजे. स्वातंत्र्यापासून आपल्या समाजाचा उपयोग राजकारणी लोक करतात परंतु आत्ता आपल्यासाठी राजकारणी लोकांनी काम केले पाहिजे. ते काम करण्याचा माझा प्रामाणिक उद्देश आहे. आणि त्या दृष्टीने मी काम करतोय. आपल्यातीलच काही विद्यार्थी - विद्यार्थिनी स्पर्धा परीक्षा देऊन पुढे पुढे गेले तर तुमचा सत्कार करण्याची मला संधी आपण द्याल अशी मी आशा बाळगतो. अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट-मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतीचे मालक सविता घनश्याम गजरे व समृद्धी घनश्याम गजरे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|
| ८/२/४/१३ | १५-०५-५० | १५०-५५ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०७ ऑगस्ट २०२६

**ॲड.शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को.ऑ.हौ.सो.लि.कोतवालनगर कर्जत
ता.कर्जत,जि.रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक माधव हरि जोशी व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे हेटवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २६/२ | एकुण क्षेत्र ०-५१-०० हे आर पॉ या क्षेत्रामधील राजनाला डिमांड कॅन्सल क्षेत्र ०-२०-०० हे आर पॉ वगळुन उर्वरित क्षेत्र | ०-४७ |
| २६/५ | एकुण क्षेत्र ०-०९-०० हे आर पॉ | ०-०६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी- विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०७/०८/२०२६

**वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०९४६८५४
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी पुढे नमुद केलेली शेती मिळकत तिचे विद्यमान मालक श्री. दत्तात्रेय पांडुरंग घरत यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरवले असुन त्याबाबत विद्यमान मालक व आमचे आशिलांमध्ये बोलणी चालु आहेत. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

| गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| मौजे चौल, ता.अलिबाग | १५३४/३/अ PU-ID: 20151978358 | ०.५२.६० | ७.७९ |

सदर एकूण क्षेत्रापैकी श्री. दत्तात्रेय पांडुरंग घरत यांचे मालकीचे ०.३७.५० हे.आर.चौ.मी. इतके क्षेत्र

सदरहु मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, वारसा, कब्जा, करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालिल सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करावी. वर नमुद मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी आहे असा भरवसा जमिन मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतीबाबत आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०६/०८/२०२६

सही/-
**श्री.अमित महेश्वर देशमुख**
ॲडव्होकेट आणि नोटरी,
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुन वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. तरी मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## महावितरण — ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-०८ (२nd call), टी-०९ (२nd call), टी-३२ (४th call), टी-६८, टी-६९, टी-७०, टी-७१, टी-७२, टी-७३, टी-७४, टी-७५, टी-७६, टी-७७, टी-७८, टी-७९, टी-८०, टी-८१, टी-८२, टी-८३, टी-८४, टी-८५, टी-८६, टी-८७, टी-८८ आणि टी-९० (२nd Call) (२०२६-२७) अशा एकुण पंचवीस निवीदा महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या e-Tender च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. ०७.०८.२०२६ पासून ते दि. १४.०८.२०२६ @१३.०० वाजेपर्यंत** उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १४.०८.२०२६ ला १५.०० वाजेपर्यंत** आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

(सही)
**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांच्यामार्फत खालील कामांसाठी खुल्या ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत.

**क्र.: 1. कामाचे नाव**: कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागात रोहा ते संगमेश्वर रोड विभागातील विविध स्टेशन यार्डांदरम्यान विद्यमान इन्सुलेटेड ओव्हरलॅप (आयओएल) मध्ये सुधारणा करण्यासाठी विद्युत काम, ज्यामध्ये डिझाइन, पुरवठा, उभारणी, चाचणी व कमीशनिंग कामांचा समावेश आहे. **निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ईएल/टी/7ए/सीएचआय/2026, दिनांक: 07.08.2026. अंदाजित किंमत**: रु. 38,85,949/- (जीएसटी वगळून). **निविदा प्रपत्राची किंमत**: शून्य. **ईएमडी**: रु. 77,700/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्यानुसार). **ऑनलाइन निविदा जमा करण्याची अंतिम दिनांक व वेळ**: 28.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

**क्र.: 2. कामाचे नाव**: कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागात संगमेश्वर रोड ते मडूरा विभागातील विविध स्टेशन यार्डांदरम्यान विद्यमान इन्सुलेटेड ओव्हरलॅप (आयओएल) मध्ये सुधारणा करण्यासाठी विद्युत काम, ज्यामध्ये डिझाइन, पुरवठा, उभारणी, चाचणी व कमीशनिंग कामांचा समावेश आहे. **निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ईएल/टी/7बी/आरएन/2026, दिनांक: 07.08.2026. अंदाजित किंमत**: रु. 27,76,607/- (जीएसटी वगळून). **निविदा प्रपत्राची किंमत**: शून्य. **ईएमडी**: रु. 55,500/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्यानुसार). **ऑनलाइन निविदा जमा करण्याची अंतिम दिनांक व वेळ**: 28.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा रेल्वे संकेतस्थळ **www.ireps.gov.in** ला भेट द्यावी.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

उप मुख्य अभियंता (वर्क्स), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी यांच्यामार्फत पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदेद्वारे एक पाकिट बोली प्रणालीअंतर्गत खुली निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **कामाचे नाव**: महाराष्ट्र राज्यातील कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील चिपळूण स्टेशनच्या पश्चिम बाजूस बुकिंग कार्यालयाचे बांधकाम, ऑटो स्टँडची तरतूद तसेच परिसंचरण क्षेत्राचा विकास आणि करंजाडी (केएफडी) स्टेशन येथे माल कार्यालयाचे बांधकाम. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डीवायसीईडब्ल्यू-एमआयएससी-20-2026, दिनांक : 07.08.2026. एकूण अंदाजित किंमत**: रु. 20,38,546.27 (जीएसटी वगळून). **बोली प्रारंभ दिनांक**: 14.08.2026. **ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्याची समापन दिनांक/वेळ**: 28.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **काम पूर्ण करण्याचा कालावधी**: 4 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. सविस्तर माहिती / सहभागासाठी कृपया संकेतस्थळ **https://www.ireps.gov.in** पहा. शुद्धीपत्रक / परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जातील.

दिनांक : ०७/०८/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे वाळवटी, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) नाजली इनायतुल्ला खतीब, २) मुसरत मुसवर्वीर खतीब, ३) मुबशीर इनायतुल्ला खतीब, ४) मुसल्लम इनायतुल्ला खतीब, ५) मुसद्दीक इनायतुल्ला खतीब, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे वाळवटी, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वाळवटी ता.मुरूड | २३८ | क्षेत्र ०-५१-१० पो.ख. ०-००-०० एकुण क्षेत्र ०-५१-१० | ७.७७ |

दिनांक : ०७/०८/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे.सालपे ता.कर्जत जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील दत्तात्रय रामचंद्र क्षीरसागर आणि जितेंद्र शंकर ताजने यांनी १) परशुराम बाबु मोरे २) बबन बाबु मोरे ३) नबाबाई बळीराम घोलप ४) ताराबाई बंधु दळवी या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं हिस्सा नं | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ८१/२ | २-७५-४० गुंठे पैकी ०-३०-०० गुंठे | १२-०० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
०७/०८/२०२६
मो. नं ९२८४६७७५१६

आशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु.पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल मुदस्सिर एम.शफी पटेल, राहणार घर क्रमांक १०७, पोस्ट तळोजा, पंचनंद, नवी मुंबई ता.पनवेल, जि. रायगड, पिन कोड - ४१०२०८ यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री अमृतलाल उर्फ अमृत दामजी सांखला, राहणार मौजे ए-२३०१, रिजन्सी केस्ट, प्लॉट नंबर ४०, सेक्टर १९, खारघर, जि. रायगड पिन कोड ४१०२१० यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| मौजे शिरसे, ता.कर्जत, जि.रायगड | १५/३ | ०.१८.७० | १.८१ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. ०७.०८.२०२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. फ्लॅट नं.१०१, पाल टॉवर, भिसेगाव,
ता.कर्जत जि. रायगड.
मो. नं. ९३०७८८५७११

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नारंगी, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| नारंगी | १५/४/अ | ०-३६-०० पो.ख.०-०७-०० ०-४३-०० पैकी २८ आर एवढे क्षेत्र | रु.९.५० | १)श्रीम.जयश्री हरिश्चंद्र थळे २) श्री.सुबोध हरिश्चंद्र थळे ३) श्री.देवेंद्र हरिश्चंद्र थळे ४) श्री रत्नदिप हरिश्चंद्र थळे ५) श्री नागेश हरिश्चंद्र थळे |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. ०७/०८/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

दिनांक : ०७/०८/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे मोरोंडे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील मिळकती आमचे अशिल यांनी विद्यमान मालक रणजित अशोक पाटील व अशोक पंडित पाटील, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकती ह्या निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकती ह्या निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे मोरोंडे, ता.अलिबाग, जि.रायगड**

| मौजे | भुमापन व क्रमांक उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| मोरोंडे ता.अलिबाग | ७/१ | ०-६०-२० पो.ख.०-२९-६० एकुण क्षेत्र ०-८९-८० | १२.३७ | रणजित अशोक पाटील |
| | वर नमुद मिळकतीमधील रणजित अशोक पाटील यांच्या मालकीचे खाते क्र. ६९ क्षेत्र ०-२०-१० हे.आर.,आकार ४.१३ या मिळकतीबाबत | | | |
| | ११ | १-४६-८० पो.ख. ०-१८-१० एकुण क्षेत्र १-६४-९० | ११.६७ | |
| | वर नमुद मिळकतीमधील रणजित अशोक पाटील यांच्या मालकीचे खाते क्र. ६९ क्षेत्र १-०८-०० हे.आर., पो.ख. ०-१२-०० हे.आर., एकुण क्षेत्र १-२०-०० हे.आर. आकार ८.५९ या मिळकतीबाबत | | | |
| मोरोंडे ता.अलिबाग | १३ | ०-११-०० पो.ख. ०-००-०० एकुण क्षेत्र ०-११-०० | ०.२५ | रणजित अशोक पाटील |
| | १५/१/२ | ०-३१-०० पो.ख. ०-००-०० एकुण क्षेत्र ०-३१-०० | ६.०० | |
| | १४ | ०-३३-६० पो.ख. ०-०६-४० एकुण क्षेत्र ०-४०-०० | ६.८९ | |
| | १६ | ०-२७-८० पो.ख. ०-०४-२० एकुण क्षेत्र ०-३२-०० | ५.७० | |
| | १५/२ | ०-७८-७० पो.ख. ०-१६-३० एकुण क्षेत्र ०-९५-०० | १२.९७ | अशोक पंडित पाटील |
| | २० | ०-३५-७० पो.ख. ०-१३-४० एकुण क्षेत्र ०-४९-१० | ४.८७ | |
| | २७ | ०-१०-०० पो.ख. ०-०३-०० एकुण क्षेत्र ०-१३-०० | ०.१९ | |

दिनांक : ०७/०८/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नारंगी, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.प्रदीप प्रभाकर गावंड यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मौजे | स. नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| नारंगी | १५/६ | ०-२०-९० पो.ख. ०-०२-०० ०-२२-९० | रु.५.०० |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०७/०८/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वलवली ता.अलिबाग, जि.रायगड | ६८/१२/अ | जिरायत ०.५३.०० पो.ख. ०.०३.०० ०.५६.०० | ०.२८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य दस्त कोणत्याही प्रकारचा हित संबंध असल्यास त्यांनी या नोटीसीच्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुरव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०६/०८/२०२६

**ॲड.अमर अशोक घरत**
मु.पो. थळ, पेठ नाका,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.८८०५०३७४७४

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड क्र. १ मु. अलिबाग यांचे कार्यालय**
मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात, अलिबाग - ४०२२०९
दुरध्वनी क्र. ०२१४१२२२४२८, Email: dslrraigad@gmail.com

क्र.अपील/एस.आर.५८/२०२६/ता.कर्जत जि.रायगड/२०२६/८०१ दिनांक ०५/०८/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
१. श्री. नंदकुमार यशवंत पाटील — अपीलदार
२. श्री. प्रकाश यशवंत पाटील
३. श्रीम. यमुनाबाई यशवंत पाटील (मयत)
४. श्रीम. लक्ष्मी गोविंद राणे
सर्व रा.मु.दत्तकृपा राईस मिल, शेलू, ता.कर्जत, जि.रायगड ४१० २०१
अपिलार्थी क्र.१, २ व ४ हे स्वतः करीता व
अपिलार्थी क्र.३ हिचे वारस म्हणून

विरुद्ध

१. श्री. नारायण महादू मसणे मयत तर्फे वारस — जाबदार
१/१. परशुराम नारायण मसणे — १/२ मंगळ नारायण मसणे
१/३. गुरुनाथ नारायण मसणे मयत तर्फे वारस
१/३/१. अंजना गुरुनाथ मसणे — १/३/२. मानसी अजय जाधव मसणे
१/३/३. साक्षी गुरुनाथ मसणे — १/३/४. वैष्णवी गुरुनाथ मसणे
१/३/५. हंसीका गुरुनाथ मसणे
१/४. सुनिल नारायण मसणे — १/५. जगदीश नारायण मसणे
१/६. समीर नारायण मसणे
रा.मु.शेलू, ता.कर्जत, जि.रायगड ४१० १०१
२. श्री. शंकर महादू मसणे मयत तर्फे वारस
२/१. अनंता शंकर मसणे — २/२. बाळकृष्ण शंकर मसणे
२/३. एकनाथ शंकर मसणे
रा. मु. शेलू, पो. शेलू, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
२/४. सुरेखा शांताराम भोईर
रा.मु.भोईसावरे, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
२/५. जनाबाई गुरुनाथ राऊत
रा. मु. शेलू, पो. शेलू, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
३. उप अधीक्षक भूमि अभिलेख, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड
४. श्री. विठ्ठल पुरूषोत्तम गुजर
५.श्री. जैतु राघो तरे मयत तर्फे वारस
५/१. वामन जैतु तरे मयत तर्फे वारस
५/१/१. श्री. हेमंत वामन तरे
५/२. दामु जैतु तरे मयत तर्फे वारस
५/२/१. श्री. संतोष दामु तरे
५/२/२. तुकाराम दामु तरे मयत तर्फे वारस — ५/२/२/१. श्रीमती लक्ष्मी तुकाराम तरे
५/२/२/३. श्रीमती भारती विलास भोईर
५/२/२/२. श्री. गुरूनाथ तुकाराम तरे — ५/२/२/४. श्रीमती आरती सुरेश सोनावळे
सर्व रा. शेलु, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
६. श्री. तुकाराम बुवाजी कुंभार
७. श्री. जयराम धोंडु तरे मयत तर्फे वारस
७/१. कैलास जयराम तरे
रा. मु. शेलू, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
८. श्री. लक्ष्मण धोंडु तरे
९. श्री. काशिनाथ धोंडु तरे
१०. श्रीमती वाळकीबाई धोंडु तरे मयत
११. श्रीमती विठाबाई गणु टेंभे
१२. श्रीमती मंगल महादु मसणे
१३. श्री. तुकाराम महादु मसणे
१४. श्रीमती जनाबाई नामदेव मसणे
१५.श्री.भगवान नामदेव मसणे
१६. श्री.मनोहर नामदेव मसणे
१७. श्रीमती जया शंकर साने
१८. श्री. मोरेश्वर नामदेव मसणे
१९. श्रीमती सुरेखा सुरेश विरले
२०. श्रीमती बेबीबाई धर्मा पाटील
२१. श्रीमती सरस्वती दामोदर भागीत
२२. श्रीमती अंजना दुंदा धुळे
२३. श्री हितेश रामजी सावरीया
क्र. ४ ते २३ सर्व रा. मु. शेलू, ता. कर्जत, जि. रायगड

विषय :- मौजे शेलू, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ४, हिस्सा नं. १२ व १३ या मिळकतीबाबत

संदर्भ :- १. अर्जदार श्री.नंदकुमार यशवंत पाटील यांचा दि.३१.१२.२०२५ रोजीचा अपील अर्ज.
२. इकडील नोटीस क्र.अपील/एस.आर.५८/२०२६/ ता.कर्जत जि.रायगड/२०२६/७७५ अलिबाग दिनांक २१/०७/२०२६

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपीलाच्या विलंब माफी अर्जावरील सुनावणीची तारीख ०१.०६.२०२६, ०९.०६.२०२६, १६.०६.२०२६, २३.०६.२०२६, ३०.०६.२०२६, ०७.०७.२०२६, १३.०७.२०२६, २०.०७.२०२६, २८.०७.२०२६ व ०४.०८.२०२६ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार हे सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार क्र. २/५, ४, ६, ८, ९, ११, १७, १९, २० ते २३ यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून पुढील सुनावणी दिनांक १७/०८/२०२६ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी दुपारी १२.३० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०५/०८/२०२६

सही/-
**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**रायगड, क्र.१ अलिबाग.**

## जाहीर निविदा

**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**
**ता. माणगाव, जि. रायगड**

दिनांक ०६/०८/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड १५वा वित्त आयोग विकास कामाची निविदा खालीलप्रमाणे

| अ. क्र | कामाचे नाव/ साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निवी येथे अंतर्गत रस्ता करणे. | ५९,१५८/- | २००/- | ५९१/- | १३/०८/२०२६ सायं ०६:१५ वा पर्यंत | १४/०८/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती:-**
१.सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली /तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२.निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे यांचा राहील. निविदा ना मंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४.निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे, ता. माणगाव, जि. रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातुन शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोंचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क आर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

सही/-
**सौ. वनिता शांताराम जाधव**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**
**ता.माणगांव जि.रायगड**

## निवडक




### डीएलएलई प्रशिक्षणाला प्रतिसाद

**माणगाव** : माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागांच्या वतीने आयोजित प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव, नेतृत्वगुणांची जोपासना आणि समाजाभिमुख कार्याची प्रेरणा निर्माण करणारा हा कार्यक्रम जिल्ह्यातील महाविद्यालयांसाठी मार्गदर्शक ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वर्गातील शिक्षणाबरोबरच समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध संलग्न महाविद्यालयांतील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे समन्वयक, विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, आणि समाजाशी नाते अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास डॉ. गौतम राऊत, डॉ. कुणाल जाधव, डॉ. सचिन राऊत, डॉ. किरण पाटील, डॉ. डी. यू. कुंठेवाड, प्रा. परदेसी, प्रा. डी. आर. शिवपूजे, डॉ. डी. के. बामणे, डॉ. एस. सोनावणे आणि डॉ. आर. एम. आचार्य यांची प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे डॉ. संगीता उतेकर, प्रा. अंकिता म्हस्के, प्रा. वृषाली सालस्कर, प्रा. विशाखा पवार, प्रा. अश्विनी शेलार, प्रा. मंजिरी सावंत, प्रा. तेजस्विनी आचार्य, प्रा. मितेश मनवल, तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी प्रतिनिधींनी विशेष परिश्रम घेतले.




### युवा महोत्सवात मंदाराचे यश

**माणगाव** : मुंबई विद्यापीठ आयोजित ५९ व्या युवा महोत्सवात अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय माणगावने आपल्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या बळावर उल्लेखनीय यश संपादन करत माणगावच्या शैक्षणिक क्षेत्राचा मान उंचावला आहे. पहिल्याच सहभागात महाविद्यालयाने सांस्कृतिक आणि कलात्मक क्षेत्रात ठसा उमटवला. या महोत्सवात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वादविवाद, वक्तृत्व, ऑन द स्पॉट पेंटिंग, पोस्टर मेकिंग, कार्टूनिंग, चित्रकला अशा विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या सर्जनशीलतेची झलक सादर केली. यामध्ये महाविद्यालयाचा विद्यार्थी मंदार कदम याने आपल्या बहुआयामी कलागुणांचे अप्रतिम दर्शन घडवले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामागे महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, सांस्कृतिक विभागाचे मार्गदर्शक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. या यशाबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी, प्राचार्यांनी, सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी मंदार याचे अभिनंदन करून त्याच्या भावी शैक्षणिक, सांस्कृतिक आणि कलात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### एमएसआरडीसीच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

**पाली/वाघोशी** : पाली-खोपोली-वाकण महामार्गावरील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला असला, तरी प्रत्यक्षात हा मार्ग पुन्हा एकदा खड्डेमय झाल्याने वाहनचालकांचे हाल होत आहेत. अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने हा रस्ता आता अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. गोंदाव फाटा, पाली शहर परिसर, पाली फाटा, राबगावकडे जाणारा मार्ग तसेच वाकण परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली असून वाहन चालविणे धोकादायक बनले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी हे खड्डे नजरेस न पडल्याने अपघातांची शक्यता अधिक वाढली आहे. मंगळवारी (दि.४) ऑगस्टच्या रात्री अशाच खड्ड्यांमुळे दोन दुचाकीस्वारांचा एकाच वेळी अपघात झाल्याची घटना घडली. सुदैवाने जीवितहानी टळली असली, तरी वाहनांचे नुकसान झाले. काही दिवसांपूर्वीही एका चारचाकी वाहनाचा मोठ्या खड्ड्यात धक्का बसून टायर निखळल्याने वाहन रस्त्यातच बंद पडले होते. या पार्श्वभूमीवर एमएसआरडीसीने केलेल्या रस्ते दुरुस्तीच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# सापे-वामने स्थानकात सुविधांची वानवा

## • प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर • लोकप्रतिनिधींनी लक्ष घालण्याची मागणी

**| महाड | प्रतिनिधी |**

कोकण रेल्वे मार्गावरील सापे-वामने रेल्वे स्थानकाच्या विकासासाठी १.२५ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असली, तरी प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. त्यामुळे प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. आगामी १४ सप्टेंबर रोजी कोकणात लाडक्या बाप्पांचे मोठ्या उत्साहात आगमन होणार असून, या सणाच्या पूर्वतयारीसाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची आतापासूनच लगबग सुरू झाली आहे. मुंबई-पुण्याहून हजारो चाकरमानी याच मार्गाने प्रवास करणार आहेत. मात्र, स्थानकावरील असुविधांचे साम्राज्य आणि रखडलेली कामे पाहता, या समस्यांच्या निवारणाचा



श्रीगणेशा नेमका कधी होणार, असा संतप्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने मार्च २०२७ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले असले, तरी सद्यस्थितीतील बिकट परिस्थितीमुळे हे उद्दिष्ट वेळेत पूर्ण होईल का, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

महाड तालुक्यातील वीर, सापे-वामने, करंजाडी आणि विन्हेरे ही कोकण रेल्वेवरील महत्त्वाची स्थानके आहेत. त्यापैकी सापे-वामने स्थानकातून दररोज मोठ्या संख्येने नागरिक प्रवास करतात. मात्र, वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या या स्थानकावर मूलभूत सुविधांचा प्रचंड अभाव असल्याने प्रवाशांना कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे. स्थानकावरील फलाटावर केवळ मर्यादित भागातच छप्पर उपलब्ध असून, उर्वरित ठिकाणी प्रवाशांना उन्हा-पावसात उभे राहावे लागते. संपूर्ण फलाटावर संरक्षक छप्पर उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.

स्थानक परिसर आणि फलाटावर मोठ्या प्रमाणावर गवत वाढल्याने स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या गवतामुळे साप, विंचू यांसारख्या विषारी प्राण्यांचा धोका निर्माण होऊन प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच रात्रीच्या वेळी स्थानक परिसरातील अपुरी प्रकाश व्यवस्था या समस्येत आणखी भर घालत आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने तातडीने गवत काढून परिसर स्वच्छ करावा आणि नियमित देखभाल करावी, अशी मागणी होत आहे.

स्थानकावर पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असली तरी इतर अनेक समस्या कायम आहेत. स्थानकाकडे जाणारा नवीन रस्ता मागील काही महिन्यांत तयार करण्यात आला असला, तरी या रस्त्यावरील रेती निघून गेली आहे. त्यामुळे मुसळधार पावसामुळे दगड व खडी बाहेर येऊन रस्ता पूर्णपणे खराब होईल, अशी भीती प्रवासी व्यक्त करत आहेत. दरम्यान, स्थानकावरील कॅंटीन अनेक महिन्यांपासून बंद आहे. सध्याच्या घडीला स्थानिक गरजू नागरिकांना हे कॅंटीन चालवण्याची परवानगी देऊन ते लवकरात लवकर सुरू करावे, अशी मागणी जोर धरत आहे. याशिवाय, स्थानकाच्या बाजूला स्वतंत्र जागा उपलब्ध असतानाही वाहनांसाठी पार्किंगची सोय नाही, तसेच आपत्कालीन प्रसंगी रुग्णांसाठी रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने प्रवाशांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा प्रश्नश्नबिकट बनला आहे.

> सापे-वामने स्थानकातील असुविधांमुळे आमचा प्रवास नशिबावर सोडून करावा लागत आहे. फलाटावर वाढलेले गवत, विखुरलेली खडी आणि बंद कॅंटीनमुळे प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. मंजूर झालेला निधी तात्काळ खर्च करून रेल्वे प्रशासनाने या समस्येवर लवकरात लवकर तोडगा काढावा.
> – विजय किजबिले
> नियमित रेल्वे प्रवासी

# आदिवासींना अंधारात ठेवणाऱ्यांवर कारवाई मागणी

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र शासन आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकीकडे कोट्यवधी रुपयांच्या योजना जाहीर करत असताना, दुसरीकडे मात्र, श्रीवर्धन तालुक्यातील कुडगाव ग्रामपंचायतीचा अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये राबवल्या जाणाऱ्या आदिकर्म योगी अभियाना अंतर्गत कुडगाव आदिवासी वाडीसाठी सुचवण्यात आलेला विकास आराखडा कुडगाव ग्रामपंचायतीने बहुमताने नामंजूर करून आदिवासींच्या हक्काच्या विकासाला थेट सुरुंग लावला आहे.

ग्रामसभेत उपस्थित असलेल्या ६६ सभासदांपैकी तब्बल ६१ जणांनी या विकास आराखड्याविरोधात कौल देत तो फेटाळून लावला, तर केवळ ५ जणांनी मंजुरीच्या बाजूने मतदान केले.

अत्यंत संतापजनक बाब म्हणजे, या विकासविरोधी ठरावाला खुद्द सरपंचांनीच सूचक म्हणून पाठबळ दिले असून, स्थानिक प्रशासनाचा आदिवासीविरोधी चेहरा या घटनेमुळे उघडा पडला आहे. शासनाच्या योजनांचा लाभ आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचू नये आणि त्यांना विकासापासून वंचित ठेवून अंधारात ढकलले जावे, याच कुटील हेतूने हा ठराव संमत करण्यात आल्याचा घणाघाती आरोप केला जात आहे.

या गंभीर अन्यायाविरोधात कुडगावचे रहिवासी एजाज हवलदार यांनी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिपकडे लिखित तक्रार दाखल केली आहे. आदिवासी समाजाच्या उन्नती आड येणाऱ्या संबंधित सरपंच आणि त्या नतद्रष्ट व्यक्तींवर शासकीय नियमांनुसार तात्काळ गुन्हे दाखल करून कडक कारवाई करावी, अशी आक्रमक मागणी आता जोर धरू लागली आहे.

> **ग्रामपंचायतीने आदिकर्म योगी अभियानाचा आराखडा फेटाळून आदिवासी बांधवांवर घोर अन्याय केला आहे. सरपंचांनीच या विकासविरोधी ठरावाला पाठबळ देणे संतापजनक आहे. आदिवासींना हक्काच्या विकासापासून अंधारात ठेवणाऱ्या दोषी सरपंच आणि संबंधित व्यक्तींवर प्रशासनाने तात्काळ गुन्हे दाखल करून कडक कारवाई करावी, हीच आमची ठाम मागणी आहे.**
> **– एजाज हवलदार**
> **सामाजिक कार्यकर्ते कुडगाव.**

# होतकरू विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती देऊन गौरव

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्ता, सातत्यपूर्ण मेहनतीच्या बळावर उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने माजी विद्यार्थी डॉ. अमित दांडेकर यांच्या वतीने दरवर्षी दिली जाणारी शिष्यवृत्ती यंदाही प्रदान करण्यात आली. यावर्षी सर एस ए. हायस्कुलच्या विद्यार्थी तनया बैकर व जतन नागुटकर या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ५,००० इतकी शिष्यवृत्ती देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे संचालक प्रमोद भायदे, उदय दांडेकर, मुख्याध्यापक सरोज राणे, अस्मिता दांडेकर, अशीलकुमार ठाकूर आदी उपस्थित होते.



# दोन टोलनाक्यांपैकी एक हटविण्याची मागणी

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६ वरील पळस्पे-इंदापूर मार्गावर अल्प अंतरात उभारण्यात आलेल्या दोन टोलनाक्यांमुळे कोकणातील नागरिक, वाहनचालकांवर अन्यायकारक आर्थिक भार पडत असल्याचा मुद्दा पुन्हा एकदा केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून देण्यात आला आहे. या संदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना नवी दिल्ली येथे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात पळस्पे-इंदापूर मार्गावर खारपाडा आणि सुकेळी येथे अवघ्या सुमारे ४० किलोमीटर अंतरावर दोन टोलनाके उभारण्यात आल्याकडे लक्ष वेधण्यात आले. दोन्ही टोलनाक्यांमधील हे अल्प अंतर विद्यमान टोल धोरणाच्या तसेच जनहिताच्या भावनेशी विसंगत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर, दोन्ही टोलनाक्यांपैकी एक टोलनाका हटवून त्यांच्या दरम्यान किमान ६० किलोमीटरचे अंतर राखण्यात यावे, अशी आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यामुळे कोकणातील नियमित प्रवासी आणि वाहनचालकांवरील अतिरिक्त आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल, असा दावा करण्यात आला. केंद्र शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंतीही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे करण्यात आली.

# संकेत कुंभार यांचे स्वागत

**| उरण | प्रतिनिधी |**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून भारतीय राजस्व सेवा पदासाठी रोहा येथील संकेत कुंभार यांची निवड झाली आहे. दरम्यान, त्यांनी सोमवारी (दि.३) उरण येथे भेट दिली असता त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी सुखदेव कुंभार, शिवाजी निकम, दिगंबर काठे तसेच परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी संकेतच्या यशामागील अथक परिश्रम, अभ्यासाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून कठोर मेहनतीच्या जोरावर देशातील सर्वोच्च स्पर्धा परीक्षेत यश संपादन करता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

# शिरगाव गावात रानभाज्या प्रदर्शन

**| महाड | प्रतिनिधी |**



महाड नगरीत शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तांत्रज्ञानाची माहिती हवी यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली संलग्न रायगड शैक्षणिक संकुल संचलित महाड कृषी महाविद्यालयात मोहप्रे आचळोलीच्या कृषीकन्यांनी शिरगाव येथे ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत कृषी माहिती केंद्र व रानभाज्या प्रदर्शन आयोजित केले होते.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली विकसित झालेल्या विविध फळांच्या, जनावरांच्या जाती, भाताच्या जाती या सर्वांची माहिती त्याचबरोबर विविध अवजारे, बियाणे आणि रानभाज्या या सर्वांची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना दिली. त्याचबरोबर शेतीसंबंधीत काही मॉडेल्स तयार करून दाखवले. त्यामध्ये त्यांनी drip irrigation, mushroom production असेकाही मॉडेल्स तयार केले होते.

या प्रदर्शनामध्ये शेती संबंधित सेंद्रिय व जैविक खतांची देखील ओळख करून दिली. यावेळी शिरगाव गावचे सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. त्याचबरोबर शिरगाव ग्रामस्थांकडून मोलाचा प्रतिसाद मिळाला.

कृषी महाविद्यालय मोहप्रे-अचळोली आचळोली चे प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हणेकर आणि कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक डॉ. एस. एस. रायकर प्राध्यापिका एस. एस. घुले कृषी महाविद्यालय मोहप्रे-आचळोली यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी माहिती केंद्र व रानभाज्या प्रदर्शन करण्यात आले. कृषी महाविद्यालय मोहप्रे-आचळोली महाड कृषीकन्यामध्ये वावरे सलोनी, शेळके रेश्मा, भूमी पेद्दिलवार, क्षितिजा मोहिते, प्रणाली नरवाडे, संस्कृती कुचेकर यांचा समावेश होता.

# तटकरे महाविद्यालय विविध स्पर्धेत प्रथम

**| माणगाव | प्रतिनिधी |**

मुंबई विद्यापीठाच्या ५९ व्या युवा महोत्सवात माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालयाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कला, साहित्य, अभिनय, वक्तृत्व आणि सर्जनशीलतेच्या विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या असामान्य प्रतिभेचा ठसा उमटवत २० पैकी तब्बल १२ स्पर्धांमध्ये मानांकन मिळविले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या प्रतिष्ठित व्यासपीठावर मिळविलेले हे यश माणगावच्या शैक्षणिक इतिहासातील एक सुवर्णक्षण ठरले आहे.

मराठी कथाकथन, वादविवाद, हिंदी स्किट, मराठी स्किट, माईम या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावत आपल्या प्रभावी विचारांची मांडणीने परीक्षकांसह उपस्थितांचीही मने जिंकली.

याशिवाय इंग्रजी वक्तृत्व, मराठी वक्तृत्व आणि वन अ‍ॅक्ट प्ले स्पर्धेत द्वितीय क्रमांक, तर ऑन द स्पॉट पेंटिंग, कार्टूनिंग आणि इंग्रजी वादविवाद स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत विद्यार्थ्यांनी आपली बहुआयामी गुणवत्ता सिद्ध केली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, प्राचार्य डॉ. जे. आर. पाण्डेय, उपप्राचार्य डॉ. आर. एम. आचार्य, प्रा. सुमैया अन्सारी, प्रा. स्वप्नील सकपाळ, अक्षय दायमे, हिमांशु मादगुंडे, यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# पनवेलमध्ये चार दिवसांत चार चेन स्नॅचिंगच्या घटना

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल परिसरात पहाटे कामावर जाणाऱ्या तसेच सकाळी फेरफटका मारणाऱ्या महिलांना लक्ष्य करत चेन स्नॅचिंगच्या घटना पुन्हा वाढू लागल्या आहेत. अवघ्या चार दिवसांत चार अडीच लाख रुपयांचे मंगळसूत्र आणि सोन्याच्या साखळ्या हिसकावण्यात आल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांमुळे पहाटेच्या पोलिस गस्तीच्या प्रभावीपणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. २९ जुलै रोजी सकाळी सव्वासहा वाजता नावडे कॉलनीतील सागर स्वीट फरसान दुकानासमोर कामावर जाणाऱ्या २९ वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी हिसकावले. या घटनेनंतर अवघ्या २० मिनिटांत बारवई गावाच्या पुलाजवळ दुचाकीस्वार चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून पलायन केले. ३ ऑगस्ट रोजी सकाळी पावणेसहा वाजता नवीन पनवेलमधील श्रेयस रुणालयासमोर कामावर जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि सोनसाखळी हिसकावली. त्याच दिवशी सकाळी साडेसहा वाजता खारघर सेक्टर-१२ मधील प्रणाम हॉटेलशेजारी फेरफटका मारणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोनसाखळीही दोन चोरट्यांनी लंपास केली. या चारही प्रकरणांची नोंद तळोजा, पनवेल तालुका, खांदेश्वर आणि खारघर पोलीस ठाण्यांत करण्यात आली असून, आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**माती उत्खननामुळे रानभाज्याच नष्ट | रोजगाराअभावी आर्थिक परिस्थिती हलाखीची**

# आदिवासींचे उपजीविकेचे साधन धोक्यात

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात मुळ निवासी म्हणून वास्तव्यास आहेत. निरक्षरता, रोजगाराचा अभाव, परिणामी आर्थिक हलाखीची परिस्थिती यामुळे येथील आदिवासी नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असून, ते जंगलातील कंदमुळे, रानभाज्या, मासेमारी या माध्यमातून आपली उपजीविका करीत आहेत. सध्या पावसाळी रानभाज्यांचे पिक आले असून, पावसाळ्यातील



रानभाज्या खाण्यासाठी अत्यंत चविष्ट व रुचकर असतात.

कंटोलाची भाजी तर आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी अशी आहे. मात्र, माती उत्खननामुळे रानभाज्याच नष्ट झाल्या आहेत. अशी खंत आदिवासी महिलांनी व्यक्त केली.

तालुक्यात अनेक ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून माती चोरी होत असल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी तर अक्षरश: डोंगर पोखरून मातीचे उत्खनन मोठ्या प्रमाणावर केले जात असल्याचे दिसून येत आहे. याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने शासनाचा महसूलही बुडत आहे.

विकासाच्या नावे अनेक मोठमोठे प्रकल्प, गृहप्रकल्प उभारण्यात येत आहेत. त्यामुळे या ठिकाणी जेसीबीच्या साह्याने सर्रास मातीचे उत्खनन होत असल्याने, नैसर्गिक साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

विविध प्रकारच्या रानभाज्यांची पावसाळ्यात उगवण या डोंगर भागात अधिक प्रमाणात होत होती. मात्र, येथील डोंगरच भुईसपाट होत आले आहेत. त्यामुळे येथील नैसर्गिक साधन संपत्ती नामशेष होण्याच्या मार्गावर आली असून, आदिवासी बांधवांचे उपजीविकेचे साधन धोक्यात आले आहे.

> **नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास**
> उरण तालुक्याचा झपाट्याने विकास होत आहे. मात्र, हा विकास नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास करीत आहे. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीवर अवलंबून असणाऱ्या आदिवासी बांधवांचे उपजीविकेचे साधन धोक्यात आले आहे.

# अरुण म्हात्रे सेवानिवृत्ती

**| पेण-कोप्रोली | प्रतिनिधी |**



कोप्रोली गावाचे माजी सैनिक अरुण आत्माराम म्हात्रे हे पेण उपविभागीय कार्यालयातील महसूल सहायक पदावरून नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांच्या सेवानिवृत्ती गुणगौरव सोहळा ५ ऑगस्ट रोजी कोप्रोली येथे करण्यात आला होता. म्हात्रे यांनी भारतीय स्थलसेनेत १७ वर्षे सेवा बजावल्यानंतर महसूल व वन विभागात तब्बल १८ वर्षे कार्य केले. त्यांच्या प्रदीर्घ सेवेला यावेळी उपस्थितांनी गौरवपूर्ण मानवंदना दिली. यासोहळ्यास त्यांच्या सैन्यदलातील सहकाऱ्यांसह उपविभागीय कार्यालयातील कर्मचारी, कुटुंबीय, मित्रपरिवार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत अनेक आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्यांचा मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच कर्मचाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी विशेष गीत सादर करून त्यांना भावपूर्ण शुभेच्छा दिल्या.




## राशीभविष्य

- **मेष :** ग्रहमानाच्या अनुकूलतेमुळे अपेक्षित फल मिळेल. व्यवसायात वृध्दी होईल. अडचणींवर मात कराल.
- **वृषभ :** दिलासादायक घटना घडतील. आर्थिक कामं मनासारखी होतील. विद्यार्थ्यांना दिलासा मिळू शकेल.
- **मिथुन :** नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्याव्या. सरकारी कामांना गती येईल. यांत्रिक क्षेत्रात संधी मिळेल.
- **कर्क :** प्राप्तीचं प्रमाण उत्तम राहील. मुलांच्या प्रश्नातून मार्ग निघेल. ज्येष्ठांनी प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **सिंह :** महत्त्वाचे निर्णय प्रलंबित राहतील. प्रवासातील ओळखीतून लाभ होईल. स्थावर प्रश्न रखडतील.
- **कन्या :** कलाकारांना उत्तम संधी लाभतील. कार्यकौशल्यात वाढ होईल. नव्या योजना मार्गी लागतील.
- **तूळ :** सरकारी कामं मनाजोगी होतील. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. थोरामोठ्यांच्या भेटी होतील.
- **वृश्चिक :** आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. दानधर्माकडे विशेष ओढा राहील. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **धनु :** महत्त्वाचे करार लांबणीवर पडतील. व्यवसायात साधारण स्थिती राहील. आर्थिक नुकसान संभवतं.
- **मकर :** स्वकर्तृत्त्वावर भर द्यायला हवा. इतरांकडून अपेक्षा नको. कायदेशीर बाबतीत विशेष काळजी घ्या.
- **कुंभ :** अपेक्षित यश साध्य करता येईल. सामाजिक क्षेत्रात संधी लाभतील. कौटुंबिक ताण-तणाव राहील.
- **मीन :** प्रलंबित कामं मार्गी लागतील. गुंतवणुकीला अनुकूलता राहील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.

## दिन विशेष

### ७ ऑगस्ट

**१९७४ :** गायिका अंजनीबाई मालपेकर यांचा मृत्यू.
**१९८५ :** विकिपीडीयाचे सहसंस्थापक जिमी वेल्स यांचा जन्म.
**२०१५ :** पाकिस्तानने राष्ट्रकुल संसदीय संघटनेच्या अधिवेशनासाठी जम्मू-काश्मीर विधानसभेच्या अध्यक्षांना निमंत्रण टाळलं.
**२०१७ :** हंडी फोडणाऱ्या गोविंदांच्या वयावरील निर्बंध उठवले.
**२०१८ :** द्रविड मुन्नेत्र कळघमचे सर्वेसर्वा आणि तमीळ चित्रसृष्टीतील अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणारे 'कलैग्नार' एम. करुणानिधी यांचे निधन.

## आरोग्यमंत्र

### फायदे मेथीचे

मेथीमध्ये अनेक औषधी गुणधर्म देखील आढळतात. मेथीच्या पानांमध्ये लोह, कॅल्शियम, फॉस्फरस, प्रथिने आणि व्हिटॅमिन के जास्त प्रमाणात आढळतात. मेथीच्या पानांची पालेभाजी नुसती रुचकरच नव्हे, तर अनेक विकारांचा धोका कमी करणारी आहे. मेथीच्या दाण्यापासून रक्तातील साखर कंट्रोल होण्यास देखील मदत होते. मधूमेहींनी मेथीचे दाणे व मेथीची पाने या दोन्ही पदार्थांचा आहारात समावेश केल्यास त्यांना चांगला फायदा होऊ शकतो. कारण मेथीमधील गॅलॉक्टोमेनिन या नैसर्गिक विद्रव्य फायबर घटकामुळे रक्तात साखर शोषण्याचे प्रमाण कमी होते. मेथीची पेस्ट केसांना लावल्यास अथवा मेथीचा आहारात वापर केल्यास केस अधिक काळे व चमकदार होतात. मेथीची पाने बारीक करा आणि आंघोळीच्या अर्धा तास आधी केसांना लावा, कोंडा लवकर संपेल. मेथीची पाने भिजवून पेस्ट बनवून त्वचेवर लावल्यास त्वचा स्वच्छ व मऊ दिसते. मेथीच्या पानात चिकट पोषक घटक असतात, ज्यामुळे त्वचेला कोरडेपणापासून संरक्षण होते. मेथी बारीक करून पेस्ट बनवून चेहऱ्यावर लावल्यास काळे डाग दूर होतात. मेथीची पाने चेहऱ्यावरील सूज कमी करते. मेथीच्या पानांचा रस लहान मुलाना दररोज एक चमचा दिल्यास पोटातील किडे दूर होतात. छातीत जळजळ होत असल्यास रोजच्या आहारात एक चमचा मेथी दाण्याचा समावेश करा. यासाठी मेथीचे दाणे पाण्यामध्ये भिजत ठेवा व नंतर स्वयंपाकामध्ये वापरा. तोंड आले असल्यास, घसा बसला असल्याच मेथीची पाने भिजवलेल्या पाण्याने गुळण्या कराव्यात. त्यामुळे आराम मिळतो. सकाळी रिकाम्या पोटी मेथीचे दाणे खाल्याने पोट साफ राहते.



## सफर देशांची

### खनिजसंपत्तीने समृद्ध 'गिनी'

'गिनी' हा पश्चिम आफ्रिकेतला एक देश आहे. या देशातले लोक फ्रेंच बोलतात. सेनेगल, माली, लायबेरिया हे गिनीचे शेजारी देश. 'कोनॅक्रे' ही गिनीची राजधानी. हा देश एकेकाळी 'फ्रेंच गिनी' या नावाने ओळखला जायचा. २ ऑक्टोबर १९५८ या दिवशी गिनीला फ्रान्सकडून स्वातंत्र्य मिळालं. 'गिनिअन फ्रँक' हे इथलं चलन आहे. भौगोलिकदृष्ट्या गिनीचे चार भाग आहेत. नायगर, गँबिया आणि सेनेगल अशा प्रमुख नद्यांसह इतर २२ नद्यांचा उगम गिनीमध्ये होतो. या देशाला ३२० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. या देशात तीन राष्ट्रीय उद्यानं आहेत. गिनीतल्या काही ठिकाणांना युनेस्कोने जागतिक वारसा यादीतही स्थान दिलं आहे. 'कंबादागा धबधबा' हे इथलं खास आकर्षण आहे. हा धबधबा जंगलांनी वेढलेला असल्यामुळे माकडं तसंच रंगीबेरंगी पक्षी इथे पहायला मिळतात. फुटबॉल हा या देशातला लोकप्रिय खेळ आहे. भात हे इथल्या लोकांचं मुख्य अन्न आहे. १८९० मध्ये फ्रेंच लोकांनी गिनीचा ताबा घ्यायला सुरूवात केली. त्याआधी या देशावर विविध आफ्रिकन साम्राज्यांनी राज्य केलं. या देशाने स्वातंत्र्य मिळवण्यासाठी बराच संघर्ष केला.

## स्टाईल स्टेटमेंट

### फॅशनेबल योगा सेशनसाठी...

फिटनेससाठी अनेकजण योगाला प्राधान्य देतात. योगाला अलिकडे खूप ग्लॅमर मिळालं. बॉलिवूड सेलेब्जही आपले योगा करतानाचे फोटो आणि व्हिडिओ पोस्ट करत असतात. त्यांचा स्टायलिश अंदाज आपल्याला आकर्षित करतो. योगा हा व्यायामप्रकार असला तरी आसनं करताना फॅशनेबल रहायला काय हरकत आहे? तुम्हीही योगा क्लासला जात असाल तर स्टायलिंगचे हे फंडे वापरता येतील.

* सध्या स्लीम जॉगर्सचा बोलबाला आहे. या जॉगर्स ट्रॅक पँटसारख्याच आरामदायी असतात. शिवाय त्या खूप स्टायलिश दिसतात. या जॉगर्स अंगाला चिकटून बसत नाहीत. यामुळे शारीरिक हालचाली अगदी सहज करता येतात. यासोबत फ्लिपफ्लॉप्सही कॅरी करता येतील.

* क्रॉप टॉप्स कायमच इन असतात. ही फॅशन कधीच बाद होत नाही. १९७० पासून या टॉप्सची चलती आहे. स्लीम जॉगर्सवर बॅगी क्रॉप टॉप्स घालता येतील. फिटनेसच्या क्रेझमुळे क्रॉप टॉप्सना खूप प्रसिद्धी मिळाली आहे. अत्यंत आरामदायी असे हे टॉप्स खूप छान दिसतात. **(क्रमश:)**

## पंचांग

**शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
आषाढ कृ. ९, चंद्रराशी : वृषभ,
नक्षत्र : कृत्तिका, योग : वृद्धि,
सूर्योदय ६.२०, सूर्यास्त ७.०९

## फॉरवर्ड्स

**क़ाम पड़ सकता हैं...**

**आधें रिश्तें तों लोग़ इसी वज़ह सें निभा रहें हैं...!**

## वेगळ्या वाटा

'क्लाउड कॉम्प्युटिंग' ही एक प्रणाली आहे. 'गुगल क्लाउड', 'ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस' आणि 'मायक्रोसॉफ्ट एज्योर' या क्लाउड कॉम्प्युटिंग क्षेत्रातल्या मोठ्या कंपन्या आहेत. खाजगी क्लाउड्सही आपल्या सेवा देत आहेत. त्यांचाही बराच वापर केला जातो. 'एचपी' आणि 'आयबीएम'सारख्या जुन्या आयटी इन्फ्रास्ट्रक्चरसोबतच 'न्यूटॅनिक्स'सारखे नवे गडीही सेवा देत आहेत. म्हणूनच आजच्या काळात 'क्लाउड कॉम्प्युटिंग' हे अपस्किलिंगसाठी अत्यंत योग्य असं तंत्रज्ञान मानलं जातं. आयटी क्षेत्रात सध्या 'क्लाउड सोल्यूशन आर्किटेक्ट्सना सर्वाधिक वेतन दिलं जातं. **(क्रमश:)**

## करिअरवाटा

### बना ॲक्वाकल्चर टेक्नॉलॉजिस्ट

समुद्राशी संबंधित कारकिर्दीचा विचार करताना फिशरीज म्हणजे मत्स्य व्यवसायाच्या शिक्षणाचा प्राधान्यक्रमाने विचार करायला हवा. सध्या विविध संस्थांमध्ये फिशरीज टेक्नॉलॉजी किंवा ॲक्वा कल्चर या नावाने पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यामध्ये



माशांच्या पैदाशीपासून जतनापर्यंत आणि त्यांच्यावर प्रक्रिया करून निर्यात करेपर्यंत अनेक प्रकारचे रोजगार निर्माण होऊ शकतात. भारताच्या तीन बाजूंना समुद्र आहे. त्यामुळे मासेमारीबाबत आपला देश जगात अग्रस्थानी आहे. परंतु मासे नाशवंत आहेत. त्यामुळे निर्यात करायची तर त्यावर अनेक प्रकारच्या प्रक्रिया कराव्या लागतात. या प्रक्रियांची माहिती अभ्यासक्रमांमध्ये दिली जाते. बी.एस्सी. पदवीधारक या फिशरीजच्या पदविकेसाठी प्रवेश घेऊ शकतो. हा पदविका अभ्यासक्रम दोन वर्षात पूर्ण करता येतो. मत्स्य व्यवसाय वाढवण्यासाठी देशात आवश्यक कुशल मनुष्यबळाची निर्मिती करणं हा या अभ्यासक्रमाचा हेतू आहे. असं असलं तरी मच्छिमारीला एक मर्यादा असते. वारेमाप मच्छिमारीने पर्यावरणाचं मोठं नुकसान होऊ शकतं. म्हणून माशांची पैदास आणि मच्छिमारी यांचा समतोल राखण्याची गरज असते. त्यासाठी अभ्यासक्रमामध्ये पैदाशीविषयी शास्त्रीय माहिती दिली जाते.

## खेचाखेची

### विस्मरण

एके दिवशी मी डॉक्टरांकडे गेलो. डॉक्टरांनी मला विचारले, 'काय होतेय?'
मी सांगितले, 'हल्ली मला फार विसरायला होतेय.'
तर...
.
.
.
.
.
डॉक्टरांनी मला तपासण्यापूर्वीच त्यांचे बिल दिले !!!

## वेगळं काही

खोदकामासाठी किंवा ढीगारा उचलण्यासाठी जेसीबीचा वापर केला जातो. ही जेसीबी पिवळ्या रंगाची असते. जेसीबी जगभरात वापरली जाते. या उपकरणाला आपण जेसीबी याच नावाने ओळखतो. या उपकरणाची रंजक माहिती जाणून घेऊ.

जेसीबी ही ब्रिटनमधली एक कंपनी आहे. याचं मुख्यालय इंग्लंडमधल्या स्टॅफर्डशायर शहरात आहे. जेसीबी या उपकरणाची निर्मिती १९४५ मध्ये करण्यात आली. तेव्हा या उपकरणाला काहीच नाव देण्यात आलं नव्हतं. निर्मात्यांनी याच्या नावाबाबत बरंच चर्वितचर्वण केलं. पण सुयोग्य नाव न मिळाल्याने निर्माते जोसेफ सायरिल बमफोर्ड यांच्या नावाची अद्याक्षरं जोडून जेसीबी असं नाव देण्याचं ठरलं. **(क्रमश:)**

## सौंदर्यसाधना

### असे सजवा डोळे

डोळ्यांचा मेक अप परफेक्ट असेल तर रुप अधिक उत्तम प्रकारे खुलतं. म्हणूनच आय मेक अपच्या काही टिप्स जाणून घ्यायला हव्या.



* डोळ्यांचा मेक अप पसरू नये यासाठी आय प्रायमरची भूमिका महत्त्वाची असते. मात्र त्वचेशी मिळतजुळतं आयप्रायमर लावावं. त्यामुळे आयशॅडोलाही उठाव मिळतो. * अनेकींचे आयलॅशेस तेलकट असतात. अशा वेळी मस्कारा जास्त काळ टिकत नाही. हे टाळायचं तर बीबी आणि सीसी क्रीम कन्सिलरसोबत मिसळावं आणि आयबेस क्रीम बनवावं. हे क्रीम पापण्यांवर लावावं आणि लूज पावडरने सेट करावं. यामुळे पापण्या तेलकट होत नाहीत. * डोळ्यांखाली काळी वर्तुळं असतील तरच कन्सिलरचा वापर योग्य ठरतो हा गैरसमज आहे. घरच्या घरी आय मेक अप करत असाल तर कन्सिलरचा आवर्जून वापर करावा. * आयशॅडो लावताना चांगल्या प्रकारे ब्लेंड करणं गरजेचं आहे. पहिल्यांदा आयशॅडो वापरणार असाल तर पावडर आयशॅडोची निवड करावी. * आय मेक अपसाठी फ्लॅट ॲप्लीकेटर ब्रश सर्वात योग्य आहे. ब्रो बोनला उभारी देण्यासाठी फ्लॅट अँगल ब्रश वापरावा.

## सुडोकू १३५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | ५ | ३ | | २ | ७ | |
| | ७ | ८ | | ४ | | | | |
| ९ | | | | | | | | |
| ८ | | | | | | ६ | | |
| | १ | | ७ | ६ | २ | | ५ | |
| | | ४ | | | | | | २ |
| | | | | | | | | ५ |
| | | | | २ | | १ | ८ | |
| | ८ | ३ | | ७ | १ | | | ६ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ६ | ५ | ३ | ९ | २ | ७ | ८ |
| २ | ७ | ८ | १ | ४ | ६ | ५ | ३ | ९ |
| ९ | ३ | ५ | २ | ८ | ७ | ४ | ६ | १ |
| ८ | ५ | २ | ३ | १ | ४ | ६ | ९ | ७ |
| ३ | १ | ९ | ७ | ६ | २ | ८ | ५ | ४ |
| ७ | ६ | ४ | १ | ५ | ८ | ३ | १ | २ |
| ६ | २ | १ | ८ | ९ | ३ | ७ | ४ | ५ |
| ४ | ९ | ७ | ६ | २ | ५ | १ | ८ | ३ |
| ५ | ८ | ३ | ४ | ७ | १ | ९ | २ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक १३५

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | ■ | ४ | ■ | ५ | | ६ | ७ | ■ | ८ | ९ |
| | ■ | | ■ | १० | | | ११ | | ■ | १२ | | १३ | ■ | |
| १४ | १५ | ■ | १६ | | ■ | १७ | | ■ | १८ | | ■ | १९ | २० | |
| २१ | | २२ | | | २३ | ■ | २४ | २५ | | ■ | ■ | २६ | | ■ |
| ■ | २७ | | | ■ | २८ | २९ | | | ■ | ३० | ३१ | | ■ | ३२ |
| ३३ | ■ | | ■ | ३४ | | | ■ | ३५ | ३६ | | | ■ | ३७ | |
| ३८ | | | | ■ | ३९ | | ४० | ■ | | ■ | ४१ | ४२ | | |
| | ■ | | ■ | ४३ | | ■ | ४४ | ४५ | | ४६ | ■ | ४७ | | ■ |
| ४८ | ४९ | ■ | ५० | | | ५१ | ■ | | ■ | ५२ | ५३ | | ■ | ५४ |
| ■ | ५५ | ५६ | ■ | | ■ | ५७ | | | ५८ | ■ | | ■ | ५९ | |
| ६० | | | ६१ | ■ | ६२ | | ■ | ६३ | | | | | ■ | |
| | ■ | ६४ | | | | ■ | ६५ | ■ | | ■ | | ■ | ६६ | |
| ६७ | | ■ | | ■ | ६८ | ६९ | | ■ | ७० | ७१ | | ■ | | ■ |
| | ■ | ७२ | | ७३ | ■ | ७४ | | ७५ | ■ | | ■ | ७६ | | ७७ |
| ७८ | | | ■ | ७९ | | | ■ | ८० | | | | | ■ | |

**आडवे शब्द :-**
१) वर-वधूची मिरवणूक
५) हयगय, दुर्लक्ष
८) स्वच्छ
१०) साखळी लावलेला लोंबता दिवा
१२) हवेतील शीतलता
१४) गळाला अडकणारा जलचर
१६) फिकीर, काळजी
१७) एक द्विदल धान्य
१८) एकटा, शिंपण
१९) सत्तावीसावे नक्षत्र
२१) संगोपन
२४) लाकडी जिना
२६) गळ्यामागचा प्रतिष्ठित अवयव
२७) अधिक श्रेष्ठ, वरचढ
२८) ऐक्य, तादात्म्य पावणे
३०) केसांना मूळ रंग आणण्याचा पदार्थ
३४) अरण्य
३५) राजाचा राज्य करण्याचा काळ
३७) सर्प
३८) मध्यम प्रमाण
३९) खोदकाम
४१) गोजी, पाडी, जनावरांचे बछडे
४३) बेकरीतील एक पदार्थ
४४) प्रत्यक्ष दिलेली धमकी
४७) हत्या, खून
४८) मीटिंग, विचार मांडण्यासाठी बोलावलेली बैठक
५०) हातोहात, त्वरित
५२) निमित्त
५५) निमग्न, गुंग
५७) मनाची शक्ती
५९) बाप
६०) रात्रभर
६२) आरोप
६३) गुजराती नृत्यप्रकार
६४) अतर्क्य घटना
६६) अजगर
६७) मोठी चूल
६८) भेग, चीर
७०) नवऱ्याची दुसरी पत्नी
७२) पैंजण
७४) राज्य, एक पंथ
७६) बाळाचा गुटगुटीतपणा
७८) यमराज्य
७९) कोर्टातील अशीलाचा आधार
८०) तांबड्या पंखाचा पोपट

**उभे शब्द :-**
१) जंगली फुलांचा हार
२) बूड
३) रेलचेल, विपुलता
४) जंगलातील आग
५) आकस, मत्सर
६) हाडांचा सापळा
७) भय, भीती
९) उपहास, चारचौघात झालेला पचका
११) मनाचा उदार, मनमिळाऊ
१३) अगणित, पुष्कळ
१५) सज्जन, साव
१६) शोध, माग
१८) पावसाची झड
२०) इंग्रजीतील पहिला आकडा
२२) नरसिंह
२३) माणूसघाणा, मत्सरी
२५) सीमोल्लंघनाचा सण
२९) चिंतन
३०) विळखा, मिठी
३१) खोटा, तात्पुरता राग
३२) वस्त्र)
३३) अफूचे बी
३६) खाण्याची तंबाखू
३७) दक्ष, सतर्क
४०) मोठी नदी
४२) मीठ
४३) वाघूळ, एक लहानसा पक्षी
४५) थडगे
४६) समीक्षा, प्रतिकूल मत
४९) हिंदुस्थान
५१) सरोज, पंकज
५३) रुक्ष
५४) राजाची कचेरी
५६) हुबेहूब, अगदी त्याच प्रमाणे
५८) हावरटपणा
६०) राज्यपाल किंवा राष्ट्रपती यांचे निवासस्थान
६१) रम्य, मनोहर
६२) पारा लावलेली काच
६५) पडदा
६६) नभ
६९) गवंड्याकडचे पाणी वाहून नेण्याचे कातडी साधन
७१) केस कापणे
७२) पवित्र
७३) बारीक केस
७५) सगळा, कर
७६) तमाशाचा फड
७७) सैन्यदल

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | का | ल | प | ट्टी | ■ | सा | ■ | तों | ■ | शी | ल | वं | त | ■ |
| ■ | न | व | री | ■ | का | ल | व | ड | ■ | त | वा | ■ | प | र |
| ब | शी | ■ | क्षा | ल | न | ■ | ट | ■ | का | क | ■ | फा | ■ | ज |
| ■ | ल | ता | ■ | स | न | द | ■ | म | ■ | र | स | र | शी | त |
| ल | ■ | र | म | णी | ■ | म | हा | न | ता | ■ | र | ■ | र | म |
| व | स | व | स | ■ | वा | ट | ■ | मु | ■ | ज | ब | डा | ■ | हो |
| ण | ■ | ट | ■ | स | खा | ■ | ज | रा | ■ | न | त | ■ | व | त्स |
| सा | न | ■ | क्ष | प | ण | क | ■ | द | श | क | ■ | क | ण | व |
| ग | ■ | का | ■ | क | णी | दा | र | ■ | नि | ■ | दा | स | ■ | ■ |
| र | म | णी | य | ■ | ■ | चि | व | चि | वा | ट | ■ | ब | क | रा |
| ■ | ज्ञा | ■ | म | ना | ■ | त | ■ | क | र | प | णे | ■ | पा | य |
| अ | व | हे | ल | ना | ■ | ■ | प | ट | ■ | री | ■ | क | ळ | ■ |
| गो | ■ | र | ■ | वि | ना | य | क | ■ | गो | ■ | दा | रा | ■ | ज |
| द | र | ■ | म | ध | ■ | म | ड | के | ■ | को | ■ | म | क्षि | का |
| र | वि | वा | र | ■ | भा | क | ■ | स | ड | स | डी | त | ■ | त |

# मुंबई-गोवा महामार्ग प्रवाशांच्या जीवावर

- निकृष्ट पुलांचे बांधकाम, खड्ड्यांचे साम्राज्य
- अपूर्ण बायपास आणि बिनधास्त टोल वसुली



**| माणगाव | प्रतिनिधी |**

देशातील महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गांपैकी एक असलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाची अवस्था दिवसेंदिवस अधिकच भयावह होत चालली आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही अनेक ठिकाणी महामार्ग निकृष्ट दर्जाचा असल्याचे चित्र समोर आले असून, विविध पुलांवर तडे, खोल खड्डे, उंच-सखल रस्ता, अपूर्ण बायपास, वाहतूक कोंडी आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे प्रवाशांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

गणेशोत्सवासारखा मोठा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना लाखो चाकरमानी कोकणात येणार आहेत. मात्र, महामार्गाची सद्यस्थिती पाहता प्रशासनाच्या नियोजनावर आणि संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महामार्गावरील अनेक ठिकाणी रस्ता इतका उंच-सखल झाला आहे. वाहनातून प्रवास करताना प्रवाशांना होडीत बसल्याचा अनुभव येतो. खोल खड्डे आणि अचानक येणारे चढ-उतार यामुळे वाहनांना जबर धक्के बसतात. या धक्क्यांचा परिणाम थेट प्रवाशांच्या शरीरावर होत असून, मान, पाठ, कंबर आणि मकण्याचे विकार वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि रुग्णांसाठी हा प्रवास अत्यंत वेदनादायी ठरत आहे.

वडखळ, नागोठणे, कोलाड, माणगाव आणि लोणेरे परिसरातील काही पुलांवर तडे, खड्डे आणि इतर त्रुटी असल्याची चर्चा स्थानिक प्रवाशांमध्ये सुरू आहे. या पुलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर शंका व्यक्त होत असून, सर्व पुलांचे स्वतंत्र आणि पारदर्शक स्ट्रक्चरल ऑडिट तातडीने करण्याची मागणी जोर धरत आहे.

महामार्गावर अनेक ठिकाणी आवश्यक दिशादर्शक फलक, परावर्तित चिन्हे, इशारा फलक, रिफ्लेक्टर, स्पीड कंट्रोल उपाय आणि इतर सुरक्षा साधनांचा अभाव जाणवतो. तसेच अपघातांची संख्या वाढत असल्याची तक्रार वाहनचालकांकडून केली जात आहे. महामार्गावर प्रवाशांसाठी पुरेशी प्रसाधनगृहे, स्वच्छतागृहे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विश्रांती केंद्रे, पथदिवे आणि आपत्कालीन सुविधा अनेक ठिकाणी उपलब्ध नाहीत. राष्ट्रीय महामार्गावर अशा प्राथमिक सुविधांचाही अभाव असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

महामार्गाची कामे अनेक ठिकाणी अपूर्ण आहेत. खड्डे, निकृष्ट दर्जाचे पूल, अपूर्ण बायपास, मूलभूत सुविधांचा अभाव आणि असुरक्षित प्रवास अशा परिस्थितीतही वाहनचालकांकडून टोलची वसुली मात्र, कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू आहे. पूर्ण सुविधा नाहीत, सुरक्षित रस्ता नाही; मग टोल कशासाठी? असा संतप्त सवाल वाहनधारक उपस्थित करत आहेत. गणेशोत्सवापूर्वी तरी शासन आणि संबंधित यंत्रणा जागी होऊन या महामार्गाची दुरवस्था दूर करतील का, की प्रवाशांना पुढेही जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागणार, असा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेला पडला आहे.

### वाहनांचे मोठे नुकसान

महामार्गावरील असंख्य खड्ड्यांमुळे दररोज वाहनांचे टायर फुटणे, सस्पेन्शन तुटणे, अलाइनमेंट बिघडणे, इंजिन आणि इतर यांत्रिक भागांचे नुकसान होणे अशा घटना घडत आहेत. अनेक वाहने महामार्गावरच बंद पडत असल्याने वाहतूक कोंडी अधिकच वाढते. वाहनधारकांना वारंवार हजारो रुपयांचा दुरुस्ती खर्च सहन करावा लागत आहे.

### माणगाव-इंदापूर बायपास अद्याप अपूर्ण

वर्षानुवर्षे चर्चेत असलेले माणगाव आणि इंदापूर बायपास अद्याप पूर्ण झालेले नाहीत. परिणामी दोन्ही शहरांमध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. विशेषतः सणासुदीच्या काळात आणि सुट्ट्यांमध्ये तासन्तास वाहनांच्या रांगा लागतात. या कोंडीमुळे माणगावची ओळखच वाहतूक कोंडीचे केंद्र अशी झाली असून, त्याचा स्थानिक व्यापारी आणि बाजारपेठेवरही विपरीत परिणाम होत आहे. अनेक जड वाहने पर्यायी मार्गांचा वापर करू लागल्याने स्थानिक अर्थकारणालाही फटका बसत आहे.

## खादीच्या तिरंग्याला पनवेलकरांची पसंती



**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

स्वातंत्र्यदिन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने पनवेल शहरातील बाजारपेठांमध्ये राष्ट्रीय ध्वजांची विक्री सुरू झाली आहे. यंदा विशेष म्हणजे खादीपासून तयार करण्यात आलेले राष्ट्रध्वज पनवेलमध्ये दाखल झाले असून नागरिकांकडून त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. अनेक नागरिक स्वातंत्र्यदिनानिमित्त घर, कार्यालय तसेच व्यावसायिक आस्थापनांवर तिरंगा फडकावण्यासाठी खादीचे ध्वज खरेदी करत आहेत.

दरवर्षी १५ ऑगस्टच्या निमित्ताने कागदाचे, नायलॉनचे तसेच प्लास्टिकसदृश साहित्याचे ध्वज मोठ्या प्रमाणावर विकले जातात.

मात्र, स्वातंत्र्यदिन संपल्यानंतर अनेक ठिकाणी हे ध्वज रस्त्यावर, कचराकुंडीत किंवा इतरत्र विखुरलेले दिसतात. यामुळे देशाच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या तिरंग्याचा सन्मान राखण्याचे आवाहन देशप्रेमी नागरिकांकडून करण्यात येत आहे. खादीचा राष्ट्रध्वज अधिक टिकाऊ असून त्याचा योग्य सन्मान राखला जातो. त्यामुळे शक्यतो खादीचाच ध्वज खरेदी करून त्याचा सन्मानपूर्वक वापर करावा, असे आवाहन विक्रेते आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

राष्ट्रीय ध्वज हा प्रत्येक भारतीयाच्या अभिमानाचा विषय आहे. त्यामुळे तिरंगा फडकविताना तसेच त्यानंतर त्याची योग्य प्रकारे जपणूक करून राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## निवडक



### भालचंद्र भगत भारतीय लष्करातून सेवानिवृत्त

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील तुडाळ गावाचे भालचंद्र मनोहर भगत हे सन २००४ साली रुजू झाल्यानंतर तब्बल २२ वर्षांनंतर ३१ जुलै २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त होऊन आपल्या मुळगावी आलेल्या भगत यांचे नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांतर्फे वाजतगाजत जंगी मिरवणूक काढण्यात आली. तसेच त्यांच्या सत्कार करण्यात आला. यावेळी भगत यांनी कोणकोणत्या ठिकाणी व कोणकोणत्या प्रसंगी विविध पदांवर कार्य तत्पर सेवा बजावली याबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांनी यापुढेही माझी देशसेवा निरंतर सुरूच राहील, असे सांगितले. या कार्यक्रमाला माजी सैनिक अमरनाथ राणे, संतोष राऊत, शार्दूल काठे, गणेश पाटील, योगेश पवार, वासुदेव आमले, गणेश भोईर, वडील मनोहर भगत, पत्नी, मुली व इतर नातेवाईक तसेच अनेक मान्यवर, मित्रपरिवार तसेच तुडाळ पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### गणपती कारखान्यांमध्ये गणेशोत्सवाची लगबग

**पेण :** अवघ्या महिनाभरावर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाची चाहूल आता स्पष्टपणे लागली असून पेण तालुक्यातील गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये सध्या प्रचंड लगबग सुरू आहे. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत कारागीर आणि कामगार मूर्तींना अंतिम रूप देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. कोठे मूर्तींवर रंगकाम सुरू आहे, तर कोठे अलंकार, दागिने आणि वस्त्रसजावटीची कामे वेगाने सुरू आहेत. काही कारखान्यांमध्ये अंतिम फिनिशिंगची धावपळ सुरू असून, मूर्ती वेळेत विविध भागांत पोहोचाव्यात यासाठी उत्पादकांची धांदल उडालेली दिसत आहे. पेणची गणेशमूर्ती उद्योग ही येथील अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा मानली जाते. वर्षभर हजारो कारागीर आणि कामगार या उद्योगाशी जोडलेले असतात. गणेशोत्सव जवळ येताच या उद्योगाला अक्षरशः सुगीचे दिवस येतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही पेणमधून तयार होणाऱ्या आकर्षक आणि देखण्या गणेशमूर्ती महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यात तसेच परदेशातही पाठविण्याची तयारी सुरू झाली आहे. त्यामुळे पेण तालुक्यात गणेशोत्सवाचे वातावरण निर्माण झाले असून, बाप्पाच्या आगमनाची चाहूल सर्वत्र जाणवू लागली आहे.



### मुलांनी गिरवले शेतीच्या लावणीचे धडे

**आगरदांडा :** ग्रामीण भागातील शेती संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी आणि श्रमाचे महत्त्व समजावे या उद्देशाने मुरूड बाजारपेठ येथील शिक्षिका तनुजा गोबरे व उमेश गोबरे यांनी शिघ्रे ग्रामपंचायत हद्दीतील नवीवाडी येथील आकांक्षा वारगे यांच्या शेतामध्ये मुलांना प्रत्यक्ष शेतात उतरून भात लावणीचा अनुभव घेतला. शिक्षिका तनुजा गोबरे यांच्या मार्गदर्शनाखाली चिखलात उतरून मुलांनी भाताची रोपे लावली. लावणीची योग्य पद्धत, रोपांमधील अंतर, पाण्याचे व्यवस्थापन आणि शेतीतील कष्ट याविषयी त्यांनी प्रत्यक्ष माहिती जाणून घेतली. या उपक्रमामुळे मुलांना शेतीविषयी आत्मीयता निर्माण झाली. तसेच अन्नधान्य उत्पादनामागील शेतकऱ्यांचे परिश्रम जवळून पाहण्याची संधी मिळाली.

## बाहुल्यांच्या खेळातून शिक्षणाचा प्रसार



**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

बाहूली नाट्यातून शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील दोन शिक्षकांनी केला आहे. महाराजस्व अभियानांतर्गत साक्षरता अभियानाचे स्टॉल बसविण्यात आले. या स्टॉलमध्ये पंधरा वर्षांवरील नागरिकांपर्यंत शिक्षणाचा प्रसार चित्र फितीद्वारे करण्यात आला. या नाविन्य उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

उमेश पाटील व रुपाली पाटील असे या दोन शिक्षकांची नावे आहेत. उमेश पाटील हे धेरंड येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये तर रुपाली पाटील या धाकटे शहापूर या शाळेमध्ये मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

पंधरा वर्षांवरील नागरिकांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, म्हणून या दोन शिक्षकांनी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी पुढाकार घेतला. महाराजस्व अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमात वेगवेगळ्या विभागाचे स्टॉल उभारण्यात आले आहे. आता शिकून काय फायदा अशी भावना मध्यम वयोगटासह वयोवृध्दांना कायमच असते. त्यांच्यामधील शिक्षणाबाबत असलेला नकारार्थी दृष्टीकोन सकारात्मक करण्यासाठी या दोन शिक्षकांनी त्यांच्या कल्पनेतून बााहूली नाट्याचे सादरीकरण केले.

शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, उपशिक्षणाधिकारी भोपळे, ग.शि कृष्णा पिंगळा, विस्तार अधिकारी विनोद पाटील, मनीषा टेमकर, रविंद्र ठोंबरे यांचे मार्गदर्शन लाभले.

## शुभेच्छा बॅनरमुळे अपघाताचा धोका



**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

लोकप्रतिनिधींनी वाढदिवसानिमित्त अनावश्यक शुभेच्छा फलक व बॅनर न लावण्याचे आवाहन केले असतानाही काही कार्यकर्त्यांकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पनवेल महापालिका हद्दीत विविध ठिकाणी वाढदिवसाचे शुभेच्छा बॅनर मोठ्या प्रमाणावर लावण्यात आले आहेत. खांदा वसाहत परिसरात एका ठिकाणी शुभेच्छा बॅनर फ्रेममधून निसटून रस्त्यावर लोळत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तेथून जाणाऱ्या वाहनचालकांना व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, दुचाकीस्वारांसाठी अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. वेळीच संबंधित बॅनर हटवून अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी होत आहे. दरम्यान, परिसरात वाहतूक पोलीस उपस्थित असल्याने कोणताही अपघात होऊ नये यासाठी दक्षता घेतल्याचे दिसून आले.

## वडाळे सरोवर जलपर्णीच्या विळख्यात

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

वडाळे सरोवरातील जलपर्णीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने मे महिन्यात राबविलेला शास्त्रीय तणनिर्मूलनाचा अभिनव प्रयोग सध्या अपुरा ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. जैविक नियंत्रणासाठी तलावात सायंटोबॅगस सल्वीनी या कीटकांचा विसर्ग करण्यात आला होता. या प्रयोगानंतर अवघ्या महिनाभरात जलपर्णीचा रंग बदलल्याने हा प्रयोग यशस्वी ठरण्याची चिन्हे दिसत होती. मात्र, पावसाळ्याला सुरुवात होताच जलपर्णीने पुन्हा डोके वर काढले आहे.

## विनायक मोरे यांचा सेवापूर्तीनिमित्त सन्मान

### ॲड. मानसी म्हात्रे, प्रशांत नाईक यांच्या हस्ते गौरव



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रामाणिकपणा, निष्ठा आणि कर्तव्यभावनेने अलिबाग नगर परिषदेच्या प्रशासकीय कामकाजाला हातभार लावणारे वरिष्ठ लिपिक विनायक यशवंत मोरे यांनी तब्बल ३० वर्षांची उल्लेखनीय शासकीय सेवा पूर्ण करून गुरुवारी (दि.६) ऑगस्ट रोजी ते निवृत्त झाले. त्यांच्या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेचा गौरव करत अलिबाग नगर परिषदेतर्फे त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक, मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्यासह अन्य मान्यवरांच्या गौरव करण्यात आला. आपल्या तीन दशकांच्या सेवाकाळात मोरे यांनी प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि प्रशासनातील कार्यतत्परतेच्या जोरावर उल्लेखनीय सेवा बजावली असल्याचे गौरवोद्गार उपस्थितांनी काढले. सत्कार समारंभास नगरसेविका अश्विनी ठोसर, निवेदिता वाघमारे, साक्षी पाटील, संध्या पालवणकर, श्रद्धा नवले, प्रियांका वाघ, प्रदीप धसाडे, नामदेव जाधव, प्रियंका मोरे, स्नेहा रणदिवे, राजेंद्र बोरे, ऋतुजा फुटाणे, संतोष मुंडे, सौरभ खरात, प्रशांत नांदगावकर यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



> विनायक मोरे यांनी तीन दशकांच्या सेवेत प्रामाणिकपणा, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठेचा आदर्श निर्माण केला आहे. नगर परिषदेच्या प्रशासकीय कामकाजात त्यांनी दिलेले योगदान मोलाचे असून, त्यांचा अनुभव आणि कार्यपद्धती भावी कर्मचाऱ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.
>
> -ॲड. मानसी म्हात्रे, उपनगराध्यक्षा

> स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार केवळ लोकप्रतिनिधी किंवा अधिकाऱ्यांवर चालत नाही, तर पडद्यामागे अहोरात्र काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समर्पित सेवेवरही तो उभा असतो. विनायक मोरे यांनी ३० वर्षेअत्यंत जबाबदारीने सेवा बजावून नगर परिषदेच्या कार्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे.
>
> -प्रशांत नाईक, वीज व बांधकाम सभापती

## ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा कलाविष्कार



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

विद्यार्थी विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ आणि पीएनपी महाविद्यालय, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५९ वा युवा महोत्सव (दि. ०४) ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आल्या युवा महोत्सवात विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य, नाट्य, वादविवाद, वक्तृत्व, चित्रकला, मूर्तीकला, मेहंदी, कार्टूनिंग, कोलाज, कथाकथन आदी विविध कलाप्रकारांमध्ये सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्या सांस्कृतिक प्रतिभेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जनता शिक्षण मंडळाच्या ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेज, अलिबाग येथील १० विद्यार्थ्यांनी ८ स्पर्धा प्रकारांमध्ये सहभाग घेऊन आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. आलिया गोंडेकर हिने इंग्रजी कथाकथन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. असबा धनसे व सोनिया हसवारे यांनी इंग्रजी वादविवाद स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. तर अरमीना सय्यद हिला कोलाज स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक, जान्हवी पाटील हिला कार्टूनिंग स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील तसेच महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. नीलम हजारे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. पियुषा पाटील, प्रा. चिन्मय राणे, प्रा. निलम म्हात्रे, प्रा. कौशिक बोडस यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी केली. आर्य पाटील व परी यांनी विद्यार्थी समन्वयक म्हणून भूमिका बजावली.

## पनवेलमधील लॉजवर छापा



**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील हॉटेल क्रांतीवीर लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग येथे छापा टाकून सुरू वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश केला. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून लॉज व्यवस्थापकासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीच्या आधारे सापळा रचण्यात आला. बनावट ग्राहक पाठवून संबंधित लॉजमध्ये दोन महिलांना वेश्याव्यवसायासाठी ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी प्रकाश गुप्ता, अनजर शेख, प्रियंजन राय यांच्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मजुरांच्या टंचाईवर यंत्राद्वारे भातलावणीचा पर्याय | चौलमळ्यात आधुनिक शेतीचा आदर्श

## पाटील कुटुंबाने धरली आधुनिक शेतीची वाट



**| चौल | प्रतिनिधी |**

दिवसेंदिवस शेतीसाठी मजुरांची टंचाई वाढत असताना अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथील शेतीनिष्ठ शेतकरी रवींद्र गजानन पाटील यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत यंत्राच्या साहाय्याने भातलावणी करून परिसरातील शेतकऱ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

कमी वेळ, कमी खर्च आणि अधिक अचूक पद्धतीने भातलावणी होत असल्याने शेतीतील यांत्रिकीकरण हा काळाची गरज असल्याचे या प्रयोगातून अधोरेखित झाले. रवींद्र पाटील यांच्या शेतावर यंत्राद्वारे भातलावणीचा प्रात्यक्षिक प्रयोग करण्यात आला. यावेळी कृषी विभागाचे मंडळ अधिकारी मोहन सूर्यवंशी, विनायक थळकर, विराज किर, दिलीप पडते यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन भातलावणीची पाहणी केली. याप्रसंगी रवींद्र पाटील, पत्नी राधिका पाटील, मुले सिद्धराज, ऋतुराज आणि सून अवंती यांनीही शेतात उतरून भातलावणीचा आनंद घेत आधुनिक शेतीला पाठिंबा असल्याचे दाखवून दिले. कृषक कल्याणकारी संस्था, चौलचे संस्थापक अध्यक्ष म्हणून रवींद्र पाटील यांनी शेतीमध्ये विविध प्रयोग यशस्वीपणे राबवले आहेत. आधुनिक शेती तंत्रज्ञान, व्यवस्थापनाबाबत त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यांत्रिक भातलावणीमुळे वेळेची मोठी बचत होत असून, मजुरीवरील खर्च कमी होत आहे.

> कृषी विभागाचे नागाव मंडळ अधिकारी सूर्यवंशी यांनी सांगितले की, शेतीतील यांत्रिकीकरण ही काळाची गरज आहे. भातलावणीसारखी श्रमप्रधान कामे यंत्राद्वारे केल्यास वेळ, मजुरी आणि खर्च यामध्ये मोठी बचत होते. अशा प्रयोगांमुळे इतर शेतकऱ्यांनाही आधुनिक शेतीचा आत्मविश्वास मिळेल. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन अधिकाधिक शेतकऱ्यांनी यंत्रांचा वापर करावा.
>
> -मोहन सूर्यवंशी

> आज शेती टिकवायची असेल तर आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार अपरिहार्य आहे. मजुरांची कमतरता दिवसेंदिवस वाढत असल्याने यंत्राद्वारे शेती करणे ही काळाची गरज बनली आहे. माझ्या प्रत्येक शेती प्रयोगामध्ये माझी पत्नी राधिका, मुलं सिद्धराज, ऋतुराज आणि संपूर्ण कुटुंब खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे असते. त्यांच्या पाठिंब्यामुळेच मी सातत्याने नवनवीन प्रयोग करण्याचे धाडस करतो. शेतकऱ्यांनीही बदलत्या काळानुसार आधुनिक शेतीकडे वळावे, याचा निश्चितच फायदा होईल.
>
> -रवींद्र पाटील, शेतकरी

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयोनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)